।। श्री ।।

# ।। अध्याय पहिला ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री गणनाथा गजानना। विनंती एकची तव चरणा। द्याया वर सामान्य जना। व्हावे प्रसन्न तुम्ही आता।।१।। सिंधु लक्ष्मण सुत विनवी तुज। पुरवावे भक्तांचे चोज। वर्णिण्या तव लीला नवशतीत। द्यावी मती मज तुम्ही।।२।। वक्रतुंड तुझे स्वरुप मानती। सगुण स्वरुपी तुज भजती। वर्णावी कैसी लीला गणपती। निर्गुण स्वरुपीही तू असशी।।३।। अग्रपूजेचा मान तुजसी। रम्य कथा तव वर्णावयासी। द्यावी बुद्धी तूच मजसी। चरणी माथा मी ठेवी।।४।। अमूर्त गणेशलीला वर्णिण्या। व्हावी प्रसन्न देवी शारदा। तैसेची कृपाघन स्वामी समर्था। द्यावे वरदान तव भक्ता।।५।। बारा वर्षांचे अखंड सत्र। चालवती ऋषी शौनक। वक्ता तेथे असे सूत। सांगतसे तो पुराणकथा।।६।। ऋषी सुताचे वर्णन

करती। म्हणती प्रसन्न तुम्हा सरस्वती। अठरा पुराणे वदवी ती। ऐकुनी झालो पापमुक्त।।७।। सूत म्हणती आता उपपुराणे। सांगेन तुम्हासी मी प्रेमाने। नारसिंह, नारदीय गणेश पुराणे। असती सर्व श्रेष्ठ त्यांत।।८।। सूत सांगती गणेश पुराण। ऐकणे असे अति दुर्मिळ। न वर्णू शके ब्रह्मदेव। मी माहात्म्य वर्णू कैसे।।९।। ब्रह्मा विष्णु अन् महादेव। गणेशकृपे करती कार्य। पंचमहाभूते ही गणेशाधीन। प्रत्यक्ष परमात्मरुप गणेश।।१०।। व्यास सांगती भृगुऋषिशी। भृगु सांगती सोमकांतासी। सोमकांते सांगितले जनांसी। सांगेन तुम्हा सोमकांत कथा।।११।। सौराष्ट देशी राजा सोमकांत। वसतसे तो देवनगरात। पराक्रमी मतिमान कांतियुक्त। क्षमाशील, गंभीर प्रकृतीचा।।१२।। विद्याधीश रुद्रवान क्षेमंकर। ज्ञानगम्य सुबल ऐसे प्रधान। असती राजकारणी कुशल। राणी सुधर्मा पुत्र हेमकंठ नाम।।१३।। परी दुर्दैव अति भयंकर। पूर्वार्जित प्रारब्ध विचित्र। पसरे गलित कुष्ठ अंगभर। भोगी राजा गतजन्म कर्म।१४।। सांगे पुत्रा जाण राजधर्म। करावे प्रातः पंचायतन पुजन। नित्य संध्या तर्पण होमहवन। अतिथी सत्कारांते भोजन।।१५।। करावे नित्य पुराण शास्त्र श्रवण। दीन दरिद्र्यांचे ही रक्षण। अपराध्या व्हावे योग्य शासन। करी कारभार अति दक्षपणे।।१६।। करी राजा पुत्रा राज्याभिषेक। तैसा गुणीजन सत्कार उचित। करुनी दानधर्म योग्य। निघाला सोमकांत वनी।।१७।। विनवी राजा प्रजा जनांसी।

सांभाळा पुत्रवत हेमकंठासी। न आणावे मनी चिंतेसी। मम पुत्र करील पालन।।१८।। हेमकंठ अन् प्रजाजन म्हणती। येतो आम्ही तुम्हा संगती। तीर्थस्नाने आपल्यास येईल कांती। येऊ परत आपण राज्यास।।१९।। सांगे राजा मग हेमकंठासी। न करावे बाळा तू मोहासी। स्मरावे नित्य नीति शास्त्रासी। पालन करी बा मम आज्ञेचे।।२०।। हेमकण्ठ घेई माता दर्शन। करी तिजसी प्रेमे वंदन। म्हणे सांगा जनकास मम मन। न्यावे मजही समवेत।।२१।। माता सांगे हेमकंठासी। न धरावे बाळा आग्रहासी। जाणुनी आता मम आज्ञेसी। जावे फिरूनी तू नगरात।।२२।। येई परतुन हेमकंठ राज्यासी। जाहले मग प्रजाजन हर्षी। चंदन जले करती स्वागतासी। उभारती गुढया तोरणे दारी।।२३।। हेमकंठ मग जाता परतून। राजा करी वन निर्गमन। येती एका सर तीरावर। असे निर्मळ जल ते सरोवर।।२४। वृक्ष वनराई परिसर सुंदर। तमाळ, बकुल, पिंपळादि देवदार। हंस, बगळे, कोकिळ विहग। निवसति तेथे अतिआनंदे।।२५।। निसर्ग रम्य समग्र परिसर। सरोवरातील जल अतिमधुर। सोमकांत सुधर्मा प्राशुनी नीर। क्षमविती आपली तृष्णा।।२६।। स्नान करुनी कंदमुळे भक्षिती। सरतीरी क्षणभर विसावती। सोमकांत चरण चुरी सौभाग्यवती। सोमकांत निद्राधीन जाहला।। २७।।इतुक्यात सुधर्मा पाही ॠषीपुत्र। पुसे तयासी मातापिता कोण। सांगे तो मी असे भृगुपुत्र। च्यवन माझे नाम असे।।२८।। च्यवन

पुसतसे सुधर्मेसी। ऐशा पुरुषा तुज दिले कैसी। का स्वीकारीले या निबिड वनासी। सुधर्मा वृत्तांत सांगतसे।।२९।। ती म्हणे हा सोमकांत राजा। भोगितसे न्याये राज्य वैभवा। परी दुर्दैव की कालमहिमा। अवस्था हीन दीन झाली।।३०।। ऐकूनी तियेचे करुण वचन। जाऊनी पित्यासी करी कथन। सांगती पिता ये तया घेऊन। आश्रमात आण आपुल्या।।३१।। येती मग ते ऋषी आश्रमी। भृगुऋषी विराजीत होते मृगचर्मी। सोमकांत नमितसे हात जोडूनी। म्हणे मम जन्म धन्य झाला।।३२।।राजा मग म्हणे ऋषींसी। न आचरिले मी पापांसी। परी ही दुर्धर व्याधी मजसी। कैसी लागली न जाणे।।३३।। म्हणती ऋषी मग त्या राजासी। होईल तुझी व्याधी नाहीसी। पूर्व जन्मीचे कर्म आले तुजसी। चिंता मुळी तू करू नको।।३४।। अभ्यंग स्नान करविले तयांसी। उंची वस्त्रे दिली ल्यावयासी। उपरी दिले मिष्टान्न भोजनासी। राजा परम संतुष्ट झाला।।३५।। दुसरे दिनी सांगितले ऋषींनी। बृहत् पापाचरण घडले गतजन्मी। त्रासिलेस सकलासह स्वपत्नी। अति पापी दुष्ट असशी तू।।३६।। अंती तुज पीडीले व्याधींनी। पापी हस्ते न घेतले दान द्विजांनी। पाहुनी पश्चाताप उपजला मनी। घेतलेस सहाय्य ब्राह्मणाचे।।३७।। होते जीर्ण गणेश मंदिर अरण्यी। केलास जीर्णोद्धार शुद्ध मनी। उरलेले द्रव्य लुबाडले आप्तांनी। अंती लाभले मरण तुला।।३८।। यमदुते बहु पीडूनी पूसिले तुजसी। आधी पुण्य

का पाप भोगिशी। उत्तरिलेस भोगीन मी पुण्यासी। सौराष्ट्र राजपुत्र तू झालासी।।३९।। ऐकून संशय उपजला मानसी। राजाच्या तनुतून हजारो पक्षी। पडून बाहेर टोचिती तयासी। राजा विनवी करा रक्षण।।४०।। ऋषी मग सांगती तयासी। संशय उपजला तव मानसी। नको भिऊ ठेवी विश्वासासी। हुंकार मात्रे नष्ट केले पक्षी।।४१।। अंत र्दृष्टीने पाहती सोमकांतासी। म्हणती पापे तुझी पर्वतप्रायसी। परी श्रवण करता गणेश पुराणासी। होतील नष्ट पापे तुझी।।४२।। श्रीगणेश नामे अभिमंत्रित नीर। शिंपडीले सोमकांताच्या अंगावर। सूक्ष्म पुरुष नाकातून पडे बाहेर। पाहता पाहता तो वाढू लागला।।४३।। असे तो पुरुष फार भयंकर। पापपुरुष तो व्यापी प्राणी शरीर। म्हणे आपणच काढीले मज बाहेर। आता कोठे राहू काय खाऊ।।४४।। भृगु तयासी आम्रवृक्ष दाविती। म्हणती त्याच्या ढोलीत करी वस्ती। खा तू झाडाची पाने वाढलेली। आज्ञा मानीतसे तो पुरुष।।४५।। त्या पुरुषाने जाऊन वृक्ष स्पर्शिला। क्षणात वृक्ष भस्मीभूत झाला। पापपुरुष भीत असे भृगु ऋषीला। भस्मात लपून तो बैसला।।४६।। ऋषी मग सांगती राजासी। जर श्रवण करशील गणेश पुराणासी। त्या पुण्याईने फुटेल पालवी वृक्षासी। होशील राजा पापमुक्त तू।।४७।। ऋषींसी राजा करी विनंती। सांगेन पुराण मीच भृगु म्हणती। सरोवरी स्नान करण्या सांगती। राजा आज्ञा पालन करीतसे।।४८।। पुराण ऐकण्याचा

संकल्प करता। तात्काळ रोग बरा झाला त्याचा। आनंदित मानसी होई राजा। म्हणे नवलपूर्ण पुराण हे।।४९।। ऋषी म्हणती जो याचे श्रवण करील। त्याची सप्तजन्म पापे नष्टतील। सहस्रमुखी शेषही न वर्णू शकेल। ऐसा अगाध महिमा गणेशाचा।।५०।। पुढे राजासी भृगु सांगती। भगवान व्यास वेदांस विभाजती। ज्ञाने गर्व उपजे त्यांचे मानसी। पुराणे रचू प्रारंभिले तयांनी।।५१।। न स्तविले तयांनी श्रीगणेशासी। न स्तविले त्यांनी अन्य देवांसी। बुद्धिभ्रम उपजला त्यांचे मानसी। बुद्धि स्तंभित झाली त्यांची।।५२।। व्यास जाहले लज्जित मानसी। गेले शरण ब्रह्मदेवासी। कली मातला नर विसरे वेदांसी। तयां करिता पूराण रचू लागलो।।५३।। परी न कळे कारण मजसी। बुद्धिभ्रम कैसा उपजे मानसी। कारण न कळे मम मतीसी। सांगुन उपाय आपण सांगावा।।५४।। ब्रह्म देवे कथिले मग व्यासांसी। गर्वे करु नये कार्यासी। गर्वे झाली फजिती अनेकांची। गर्व मत्सर करु नये।।५५।। या सुष्टीत कर्तुमकर्तुम गणेश। मी, शंकर, विष्णु तयाचे आज्ञांकित। केले नाहीस तयाचे स्मरण। सर्वज्ञ असल्याचा गर्व तुज झाला।।५६।। व्यास पुसती गणेश स्वरुप ब्रह्मासी। म्हणती त्याचे ज्ञान नसे मजसीस। ब्रह्मदेवे कथिले मग व्यासासी। सातकोटी मंत्र असती त्याचे।।५७।। करावे ध्यान आपण आपाद मस्तक। मानस पूजा करावी गणेशास। नंतर पुरश्चरणाचा करावा संकल्प। करावे मन:पुर्वक

अनुष्ठान।।५८।। ब्रह्मदेवासी मग व्यास म्हणती। मंत्र प्रभावे कोणास सिद्धि कोणती। झाली असे प्राप्त या जगती। कृपा करुनी सांगावे।।५९।। प्रलयसमयी गणेश वसे अणुरुपी। नादब्रह्म प्रगटे ॐकार रुपी। माया युक्त होऊनी प्रसवी सृष्टी। तोच असे श्रीगणेश।।६०।। ब्रह्मादि त्रिदेवांची झाली निर्मिती। कार्य कोणते न उमजे त्यांसी। त्यांनी आचरिले कठोर तपासी। श्रीगणेश मनी करुणा येई।।६१।। दिधले दर्शन तेजरुपे तयांसी। सर्वदेव मुक्तकंठे स्तविती त्यासी। म्हणती विश्वाचे कारण असशी। वेदांचे सार तूच असशी।।६२।। गणेश प्रसन्न झाला त्यांसी। म्हणे मी प्रसन्न असे तुम्हासी। मागावे आपण इच्छित वरासी। आपण गाईले ज्या स्तोत्रासी।।६३।। गाता ते स्तोत्र भक्तिभावेसी। नष्ट होतील पापे त्याची। विपुल संपत्ती प्राप्त त्यासी। मोक्षाधिकारी तो होईल।।६४।। त्रिमूर्ति होती संतुष्ट मानसी। म्हणती दृढ भक्ती असो मानसी। तैसेची आमची कार्ये कोणती। आज्ञा त्याची करावी।।६५।। गणेशे ब्रह्म्यास सांगितली निर्मिती। विष्णुने संरक्षण करावे निगुती। शंकराने आणावे प्रलयासी। ऐसी कार्ये असती तुमची।।६६।। ब्रह्मा म्हणे कैसी निर्मूसृष्टी। नसे त्याचे ज्ञान मजसी। गणेशे श्वासे हृदयी नेले त्यासी। अनंत ब्रह्मांडे पाहून तो भ्याला।।६७।। मग गणेशे त्यास बाहेर काढले। तैसेच विष्णु शंकरास दर्शन घडवले। तयांनी निद्रा केली तिथे। ब्रह्मास मात्र गर्व जाहला।।६८।। मी सहज निर्मिन

सृष्टीसी। वाटले असे ब्रह्मा मानसी। परी अनंत विघ्ने सतावती। झाला संत्रस्त ब्रह्मदेव।।६९।। मग त्याने स्मरले गजाननासी। 'कर तपश्चर्या' आकाशवाणी झाली। ऐकता आकाशवाणी विघ्ने नष्ट झाली। कैसे करावे तप तो विचारी।।७०।। मग स्मरले गजाननासी। म्हणे पहावे वटवृक्षासी। परी न कळे काही ब्रह्मासी। झाला व्याकुळ तो मनी।।७१।। स्वप्नी तया वटवृक्ष दिसे। जलमयी सृष्टीत ऐसे कैसे। वटपर्णी तया बालक दिसे। तो गणेश पाहुन नवल वाटे।।७२।। गजानन तेव्हा आला जवळी। म्हणे तव गर्वामुळे विघ्ने आली। चिंतीसी तपश्चर्या कैसी करावी। मी तुज एकाक्षर मंत्र देतो।।७३।। मंत्राचा जप करी दहा लक्ष। देईन दर्शन तुज निश्चित। करीन तुज सामर्थ्यसंपन्न। चिंता मनी मुळी नसावी।।७४।। ब्रह्मदेवे निराहारी केली तपश्चर्या। झाले गजानन प्रसन्न तया। तेजस्वी दर्शने भय उपजे तया। गणेश सांत्वन करी त्याचे।।७५।। गणेश मग म्हणे तयासी। सौम्य मी आता पहा मजसी। होईल प्राप्त जे तू इच्छिसी। ब्रह्मदेवास अत्यानंद झाला।।७६।। गणेश प्रसादे सामर्थ्य लाभले।
श्री गणेशास त्याने भावे पूजिले। कन्या उपजल्या सिध्दी बुद्धी नामे। ब्रह्मा गणेशास त्या अर्पितसे।।७७।। भृगु सांगती सोमकांतासी। ब्रह्मे निर्मिले सप्त मानस पुत्रांसी। मानसपुत्र आचरती तपश्चर्येसी। जाहले मुक्त ते मानसपुत्र।।७८।। फिरुनी निर्मिले मानसपुत्रांसी। तपश्चर्येने ज्ञान झाले त्यांसी। तेही फिरुनी

मुक्त होती। प्रजा उत्पन्न झाली नाही।।७९।। ब्रह्मा स्वतः सृष्टी निर्मितसे। बाहु, मांडया, पायापासून त्याचे। क्षत्रियादि त्रिवर्णांची उत्पत्ती होतसे। ऐसी निर्मिती चालु झाली।।८०।। नाभीपासुन आकाश निर्मिले। मस्तकापासून स्वर्गास सृजीले। पायापासून पृथ्वी होतसे। ऐसी झाली सृष्टी निर्मिती।।८१।। ऐसे समुद्र,नद्या, झाले पर्वत। झाले गवत वेली वृक्ष। विष्णु झाले होते निद्रीस्त। मधु, कैटभ कर्णातून बाहेर आले।।८२।। निंदी ते वेद, शास्त्र,देवांसी। त्रासिती सर्व चराचर सृष्टीसी। धाविले ते ब्रह्मास भक्षिण्यासी। ब्रह्मा करी निद्रादेवी स्तुती।।८३।। मधुकैटभांनी कल्लोळ मांडिला। श्री विष्णू निद्रेतून जागा झाला। विष्णुने जोराने शंख फुंकीला। मधु कैटभ झाले भ्रमीत।।८४।। म्हणती दिसे पराक्रमी पुरुष। शत्रु ऐसाच असावा प्रबळ। करावे तया समवेत युद्‌ध। मृत्यु आला तरी चालेल।।८५।। विष्णुस ते आव्हान देती। न टिकशील तू आम्हा पुढती। गर्वोन्मत्त बोल विष्णु ऐकती। म्हणती तयासी युद्‌ध करा।।८६।। राक्षस मग म्हणती विष्णुस। असती चार हस्त तुज। म्हणुनीच करिसी तू गर्व। करी बाहुयुद्ध आम्हासवे।।८७।। विष्णु खाली ठेवी आयुध। चार हस्ते तो असे झुंजत। पाच हजार वर्षे चाले युद्‌ध। राक्षसांचा पराभव झाला नाही।।८८।। विष्णु मग धरी गंधर्व रुप। वीणा घेऊन तो गायन करीत। गायने हरिणादि श्वापदे गुंग। देव गंधर्व राक्षसही मोह पावती।।८९।। शंकरही मनी

झाला प्रसन्न। प्रेषितसे निकुंभ पुष्पदंत गण। म्हणती गायकास यावे घेऊन। विष्णु आनंदे कैलासी गेला।।९०।। शंकर करीतसे सहर्ष स्वागत। विष्णु म्हणे दर्शने झालो धन्य। विष्णु करीतसे नाद मधुर गायन। स्कंद, गणेश, पार्वती प्रसन्न होती।।९१।। शंकर म्हणे मग विष्णुस। गायने मी झालो अति प्रसन्न। इच्छित वर घ्यावा मागुन। विष्णु मधुकैटभ वृत्तांत सांगती।।९२।। शंकर तेव्हा म्हणती तयास। न स्मरिले तू गणेशास। ऐसाच केला प्रारंभ युद्धास। मग जय कैसा मिळेल तुज।।९३।। विष्णु म्हणती शंकरासी। गजाननाची उपासना कैसी। करण्याचा विधी सांगा मजसी। शंकर विधी तया सांगती।।९४।। शंकर म्हणती असती सप्तकोटी मंत्र। त्यांत षडक्षर एकाक्षर श्रेष्ठ। उपदेशितो त्यातील एक मंत्र। षडक्षर मंत्राचा उपदेश देती।।९५।। शंभर वर्षे करी विष्णु मंत्रजप। तपश्चर्ये गणेश झाले संतुष्ट। विष्णु गणेशाची स्तुती करीत। मधुकैटभ नाशाचा वर मागितला।।९६।। विष्णुस सिद्धी झाली प्राप्त। गणेश मूर्तिची स्थापना करी तेथ। देव म्हणती त्यास 'सिद्धी विनायक'। सिद्धिक्षेत्र त्रिलोकी झाले प्रसिध्द।।९७।। विष्णु नंतर करीतसे युद्ध। कालांतरे म्हणे राक्षसांस। आपण असा फार प्रबळ। मजकडून वर घ्या मागून।।९८।। गर्वे मातले होते राक्षस। म्हणती तूच माग वरास विष्णु मग म्हणे दैत्यांस। तुम्हा मग हातून मरण यावे।।९९।। राक्षस म्हणती जेथे नसेल जल। तेथेची

यावे मरण आम्हास। विष्णु मांडीवर घेई तयांस। सुदर्शनचक्रे त्यांचा वध केला।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

## ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय श्री विनायक वरदा। हरशी नित्य भक्त आपदा। कथा तुझी वर्णावया। द्यावी बुद्धी या स्वामीभक्ता।।१।। गणेशाच्या कृपेकरुन। जाहला विजयी मधुसूदन। जाहला अत्यानंद देवां लागून। सारे करती त्याची स्तुती।।२।। व्यास म्हणती कमलासना। गणेश कथा गोडी लागली मना। सुख अती वाटे मम मना। ऐकवारी पुढे गणेश कथा।।३।। ब्रह्मदेव म्हणती व्यासांसी। सांगतो पुढील कथा तुजसी। भीमराजाचे हे आख्यान ऐकसी। तेणे सुटेल तव भवबंधन।।४।। पूर्वी विदर्भ देशी कौण्डिण्य नगरी। धर्मनिष्ठ भीमनृप राज्यकरी। राजे सर्व असती आज्ञाकारी। दशकोटी सेना असे भीमनृपाची।।५।। लावण्य सुंदरी त्याची ललना। हरिणाक्षी कोमलांगी अंगना। गुणवती असे अनुरुप

नामा। पति आज्ञेत सदा वर्तत असे।।६।। परी पहा राजाचे दुर्दैव। नसे अजुन त्यास संतान योग। तेण दुःखी असे तो सदैव। म्हणे मी उबगलो राज्यास।।७।। मनोरंजन, सुमंतु हे दोघे। अमात्य बुध्दिमंतु होते। पाचारून त्यांसी नृप म्हणे। राज्य आपण सांभाळावे।।८।। राजा सांगतसे त्या दोघाते। सांभाळावे राज्य धर्मापरते। पाळावे प्रेमे आपुल्या प्रजेते। आम्ही सेवू आता वन।।९।। करोनी सकलांचे समाधान। राजा निघे चारुहासिनी सह। अनेक वनोपवने ओलांडीत। जात असता झाला तृषार्त।।१०।। अवलोकीले त्याने सरोवर। होती त्यात कमळे सुंदर। गुंजन करीत होते भ्रमर। शांत सुशीतल जल त्याचे।।११।। सभोवताली रम्य उपवन। वृक्ष, सुमन, लता, प्रफुल्लघन। सर्व प्राणी क्रीडती निर्वैर। पाहुन राजा मनी संतोषला।।१२।। केले तयाने प्राशन उदक। चालला पुढे चालीत वाट। ऐकला उभयतांनी मंत्र घोष। म्हणती ऋषी विशेष राहती येथे।।१३।। राजाने प्रवेशिला ऋषी आश्रम। तेथे विश्वामित्र ऋषी तपःकाम। पदी दंडवत घाली नृपोत्तम। चारुहासिनी समवेत।।१४।। ऋषींसी सांगे मग नृप। कौण्डिण्य नगरीचा मी भूप। पत्नी मम चारुहासिनी नाम। आपले दर्शनास आलो येथे।।१५।। सेविले आता आपुले चरण। वाटे मनोरथ जाहले पूर्ण। परी संतती न होण्याचे कारण। कृपया आपाण सांगावे।।१६।। ऐकून राजाचे करुणावचन। म्हणती राजास व्यर्थ केले श्रम। तव कुलदेवता एकदंत

परमोत्तम। सकलकामना सिध्दीप्रद तो असे।।१७।। अति मदांध होऊनी दुर्मती। उपेक्षिलास तू गणपती। तेणे कोपला मंगलमूर्ती। म्हणून तुज संतती नसे।।१८।। सांगतो तुज तव पूर्वज कथा। अष्टम पूर्वज भीमराजा होता। कमला असे त्याची कांता। बहुत काळा नंतर तिज पुत्र झाला।।१९।। परी तो मुका, अंध, क्षतधारी। पूय गळे तयाच्या शरीरी। दुर्गंधी व्यापिली सूतिकागारी। पाहुन कमला करी रुदन।।२०।। राजा मग म्हणे तिजसी। नको करु शोक मानसी। करीन आरोग्य बालकासी। आता बाळाशी घाली न्हाण।।२१।। दक्ष असे नाव त्यास ठेविले। द्वादशवर्षे त्यास प्रतिपाळीले। राये बहुत उपाय केले। परी नोहे त्यासी आरोग्यता।।२२।। शेवटी वल्लभ म्हणे तिज। पुत्रास घेऊनी जा नगरा बाहेर। राजकांता कमला सुकुमार। पुत्रासवे आली वनात।।२३।। पाठीवर वाहुनी आपला सुत। वनोपवने ती उल्लंघित। होती क्षुधातृषार्त पीडित। रडत होती दीर्घस्वरें।।२४।। ऐकूनी महिलेचा स्वर। आले धावोनी तस्कर। चोरुनी नेली भूषणे अंबर। अतिशय दुःखी ती झाली।।२५।। चालली पुत्रासमवेत कमला। चालता तिज ग्राम लागला। शिवमंदिरी ठेवून सुताला। कमला भिक्षेसाठी गेली।।२६।। भिक्षान्न मागून आणले तिने। केले भोजन त्या दोघाने। मग वस्ती करुनी तेथे। दुःखे काळ कंठित होती।।२७।। पुत्रा समवेत एक दिनी। गेली भिक्षेस ती नितंबिनी। जाहले अपूर्व तये

क्षणी। अगाध करणी गणेशाची।।२८।। कोणी गाणपत्य ब्राह्मणोत्तम। त्याचा पवित्र अंगवायू उत्तम। लागला उध्दरिला गेला पुत्र। दिव्य देह पुत्रास लाभला।।२९।। हर्ष थोर झाला मातेसी। मग तेथेच करुन वस्तीसी। उदरासाठी मागून भिक्षेसी। संतोषे काळ कंठीतसे।।३०।। बाळ होता सुंदर डोळस। उपजे ममता जन मनांत। वस्त्रा भरणे देऊनी त्यास। नेती घरी कौतुकाने।।३१।। जन विचारती त्या बालका। कोण असे रे तुझा पिता। थोर आहे तुझी माता। तुजसम पुत्रा प्रसविली।।३२।। ऐकून जनांचे ऐसे वचन। मातेस पुसतसे पुत्र अजाण। सांग मम पित्याचे नाम। हासोनी तिने पुत्रा सांगितले।।३३।। कर्नाटक देशात भानुग्राम। राजा आहे वल्लभ नाम। त्याची मी असे कांता। तूही पुत्र त्याचाची।।३४।। परी जन्मलास तू चक्षुहीन। गलीत कुष्ठी कुब्ज गमन। केले उपाय द्वादश वर्ष। परी नोहे आरोग्य तुज लागी।।३५।। म्हणून तुज समवेत मजला। घातले राजाने नगरा बाहेरा। परी संकट हरण समय येता। झाली दिव्य तनु तुझी।।३६।। कोणा पुण्य पुरुष अंगवाते। पावलासी तू दिव्य देहाते। ऐकोनिया मात वचनाते। हर्षे जनांस तो निवेदन करी।।३७।। पूर्व जन्मीची कर्म संगती। लाभली त्यासी गणेश भक्ती। अष्टाक्षर मंत्र विधानोक्ती। तप करी तो बहुसाल।।३८।। झाला गणेश त्यास प्रसन्न। म्हणे मम भक्त मुद्‌गल नाम। पुरवील तुझे मनोरथ काम। त्यांचे अंगवाते तुज आरोग्य

झाले।।३९।। पावला अंतर्धान गजानन। दक्ष शोके पडला मूर्छित। सावध होऊन करी शोक। मारे हाका विनायकासी।।४०।। चाले वाट हाका मारीत। आल्या गेल्यासी तो पुसत। पाहिला का तुम्ही विनायक। मुद्‌गलाश्रमी तो पातला।।४१।। मुद्‌गल मुनींसी पाहुनी। दक्ष आनंदित झाला मनी। चरण धरी पुढे धावुनी। म्हणे आपल्या कृपे झालो दिव्य देह।।४२।। झाले प्राप्त दिव्य नेत्र। झाली कमनीय सर्व गात्र। श्रवण करु लागली श्रोत्र। जाहलो पवित्र तव कृपे।।४३।। मातेने हकीकत सांगितली। ज्याचे कृपे दिव्य तनु झाली। ती मूर्ती पाहीले अवलोकिली। त्यासाठी बहु तप केले।।४४।। मातेने ही बहु तप केले। साकडे विनायकास घातले। विनायकाने दर्शन दिधले। फेडले साकडे जन्माचे।।४५।। मज बोलिला करुणानिधी। म्हणे जाहली तव कार्य सिध्दी। मग गणराज द्विजरुप धरी। तोच महाराज तू असशी।।४६।। मुद्‌गल म्हणे तू धन्य एक। प्रत्यक्ष झाला तुज विनायक। तुझे महिमान सहस्त्रमुख। वर्णिता जाईल थकून।।४७।। मग दक्षाचे सव्यकानी। एकाक्षर मंत्र सांगती मुनी। अनुष्ठान सकल विधी विधानी। केला ज्ञानी दक्षासी।।४८।। ऐकून सोमकांत संतोषला। म्हणे मग तो भृगुऋषींना। दक्षास दिव्य देह प्राप्त झाला। मुद्‌गल ऋषींच्या अंगवाते।।४९।। आश्चर्य मज वाटे म्हणून। मुद्‌गल ऋषी बहु तपोधन। तयांसीही न घडले दर्शन। दक्षाचे ऐसे विशेष पुण्य

कोणते।।५०।। प्रश्न ऐकून संतोष वाटला। भृगु म्हणती सोमकांताला। सांगता त्याचे पूर्व कर्म तुजला। तेणे तुज धर्म कळेल।।५१।। सिंधुदेशी पल्ली नगरात। कल्याण नाम वैश्य धनाढय। पत्नी तयाची इंदुमती नाम। पति परायण साध्वी सती।।५२।। त्यांचा पुत्र बल्लाळ नाम। सदा गणेश चरणी लीन। सदा मुखी गजानन नाम। अंत:करणी गणेश भक्ती असे।।५३।। मेळवोनी बाळकांचा मेळा। ग्रामा बाहेर जावोनी अवलीळा । भजन करी वेळोवेळां। पुढे शिळा मांडोनिया।।५४।। गणेश कल्पोनी निज चित्ती। मांडतसे शिळा अति निगुती। करीतसे पूजा अहोरात्री। ध्यान स्थितीतच सदा असे।।५५।। आणोनिया दुर्वांकुर भार। भावे अर्पितसे पूजा प्रकार। वन पुष्पे अन् पल्लव भार। गणेशास तो अर्पितसे।।५६।। धूपदीप नैवेद्य भावें। बालकाने मानसी कल्पावें। तेची मनोमनी गणेशास अर्पावें। जिवेंभावें करुनिया।।५७।। घरी न राही कदाकाळी। सदा वसतसे देवा जवळी। पित्यास नावडे बालक करणी। पिता बालकावरी कोप करी।।५८।। पिता म्हणे बालकास। करावा काही विद्याभ्यास। तेणेच हित संसारास। भलत्या छंदी लागू नको।।५९।। देऊनी उपदेश बालकाते। गेला पिता स्वकार्याते। बल्लाळास न गमे चित्ते। बालकांसह बल्लाळ वनी गेला।।६०।। जन सांगती पित्याते। येणे नाशिले आमुचे मुलांतें। जमवोनिया बालकांते। जाऊनी वनात नाचतसे ।।६१।। पित्यास कळता ही गोष्टी।

आधीच तयाच्या राग पोटी। घेऊनी मग हाती वेलाटी। पिता ग्रामाबाहेर आला।।६२।। ग्रामाबाहेर आला धावत। क्रोधे थरथरा कापत। पळूनी जाती अन्य बालक। बल्लाळ बैसलासे ध्यानस्थ।।६३।। पिता झाला रुष्ट बालकावरी। निष्ठूरपणे तया लाथ मारी। आसडोनी पाडला त्यास भूवरी। बल्लाळ रुदन करीतसे।।६४।। टाकले मोडून पित्याने देऊळ। वृक्षासी बांधला बल्लाळ। म्हणे देवच तुज सोडविल। आता घरी येऊ नको।।६५।। बल्लाळ करी बहु विलाप। विघ्नारी म्हणती तुज लोक। तव भक्तीस्तव मज हे क्लेश। भक्ताभिमानी तुज कैसे म्हणू।।६६।। करीतसे तो दीर्घ शोक। मग शापिला तेणे जनक। म्हणे होऊ दे कुब्ज बधिर मूक। पापचरणी मम पिता।।६७।। पित्याने देवालय तोडीले। त्याचे हातून महादोष घडले। विनाकारण मजसी ताडीले। भोगू दे भोग जन्मांतरी।।६८।। झाला त्यास प्रसन्न गणेश। केले बल्लाळास बंध मोक्ष। अंगावर फिरवी अमृतकर। केले त्याचे शरीर दिव्य।।६९।। मग वदे बल्लळ 'देवा। हृदयी असे भक्ति ठेवा। या स्थळीचा महिमा वाढावा। आपण येथेच झाला प्रसन्न'।।७०।। ऐकोनिया त्याचे वचन। त्यासी वदे गजानन। 'तुझेच नाम आधी धरुन। नाम धारण करीन मी'।।७१।। 'बल्लाळ विनायक' हे नाम। या स्थळी धरीन तुजकारण। भाद्रपद शुक्ल चतुर्थीस काम। निज भक्तांचे पुरवीन मी।।७२।। सदैव जागृत मी येथे आता। करीन पावन

निजभक्ता। पुरवीन त्यांचे मनोरथा। 'बल्लाळेश्वर' म्हणून होईन ख्यात।।७३।। पल्लीनामें नगरी विख्यात। आजही आहे कोकणांत। विनायक तेथे असे जागृत। उध्दरीतो तो निज भक्ता।।७४।। बल्लाळाचा जाहला शाप। अंधबधिर झाला त्याचा तात। कांता त्याची करी विलाप। मग आली ती वनात।।७५।। पाहीला पुत्र तिने नयनी। बहु संतोषली ती मनी। स्नेहे आलिंगीले पुत्रा तिनी। धन्य असशी पुत्रा तू।।७६।। तव पित्याची दुर्दशा झाली। तू पाही बा निजडोळी। तेणे जगात कीर्ती भली। लाभेल तुजसी रे पुत्रा।।७७।। इंदुमतीचे ऐसे वचन। ऐकोनी बोले तिज नंदन। न पाहीन पित्याचे वदन। सत्यवचन हे माझे।।७८।। मातापिता बंधू जन। एकच माझा गजानन। तू ही करी त्याचे सेवन। रक्षी मन त्याचेच पदी।।७९।। वल्लभ नामें महा नृपती। त्याची भार्या तू निश्चिती। पुढील जन्मी इंदुमती। कमळा नामे होशील तू।।८०।। तुझा पती तुझे उदरी। पुत्र जन्मेल जन्मांतरी। दक्ष या नामें निर्धारी। होईल जगात प्रसिध्द।।८१।। उपजताच अंधबधीर। वाहेल अंगी पूय रुधिर। दुर्गंधीयुक्त कुष्ठ शरीर। प्रसवशील ऐसा कुमर।।८२।। त्याच्या रोगपरिहारासी। करील वल्लभ महायत्नासी। वर्षे द्वादश लोटता ऐसी। त्रासून अति जाईल तो।।८३।। मग पुत्रासमवेत तू तें। नगराबाहेर दवडील माते। गाणपत्याच्या शरीरवातें। दिव्य देहाते पावेल तो।।८४।। इंदुमती तीच कमला। कल्याण तोच

दक्ष जाहला। भृगु म्हणे सोमकांताला। तू ते वृत्तांत समजला असेल।।८५।। विश्वामित्रे हे कथानुसंधान। सांगता हर्षित झाला भीम। दक्षा पासून सर्व केले कथन। विश्वामित्र मुनींनी त्यास।।८६।। मग सदय मनें भीमासी। एकाक्षर मंत्र उपदेशी। मस्तकी ठेवून वरद करासी। म्हणती पुत्रासी पावशील।।८७।। भीमनृप करी गणेशाराधन। झाला गणेश तया प्रसन्न। झाला भीमास सुत उत्तम। रुक्मांगद ऐसे ठेवले नाम।।८८।। रुक्मांगद सदा गणेशोपासक। नीतीने पाळी प्रजा समग्र। एकदा मृगयेलागी फिरत। तृषाक्रान्त झाला तो।।८९।। त्याने प्रवेशिला वाचक्मांगाश्रम। ऋषी गेले होते संध्येकारण। राजा विनवितसे ऋषीपत्नीस। शीतल जल द्यावे मजसी।।९०।। ऋषी पत्नी देई जल । परी दर्शन ती होई काम विव्हळ। राजा न पुरवी कामभोग। शापिले तिने रुक्मांगदास।।९१।। तिचे शापे तो कुष्ठी झाला। मग म्हणे तो गजाननाला। पावलो हे दुःख अन्यायाविना। वाचवी तूच मज गणेशा।।९२।। जाहला प्रसन्न गजानन। झाले नारदाचे दर्शन। त्यास केले सर्व वृत्तांत कथन। नारदे अभिवादन दिधले।।९३।। नारद म्हणे नृपनाथ। विदर्भ नगरी कदंबतीर्थ। तेथे चिंतामणी एकदंत। भक्तानुकंपी असे तेथे।।९४।। जाऊन तेथे करी स्नान। होईल तुझे रोग भंजन। ऐकोनी निघाला भीमनंदन। चतुरंग सेना तेथे पातली।।९५।। चतुरंग सेने समवेत। राजा पावला कदंबतीर्थ। विधीविधाने केले

स्नान। चिंतामणीचे पूजन केले।९६।। तेणे तुष्ट झाला लंबोदर। झाले त्याचे दिव्य शरीर। राजासी झाला आनंदथोर। तेव्हाच दिव्य विमान आले।।९७।। राजासी बोलती गणेश गण। गजकर्ण असे तुम्हावर प्रसन्न। बोलाविले तुम्हा घेण्या दर्शन। राजा बहु मुदित झाला।।९८।। रुक्मांगद सकल सेने सहित। कलत्र पुत्र सर्व गणगोत। भीम चारुहासिनी समवेत। विमानस्थ सर्व झाले।।९९।। अनेक विमानस्थ सकललोक। पावते झाले गणेश लोक। पाहुनी प्रत्यक्ष विनायक। जाहले सर्व अत्यंत सुखी।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।। अध्याय तिसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

ओंकार स्वरुपी गणेश। तयाची लीला वर्णिण्या विशेष। गुंफिण्या ती नवशतीत। द्यावी मती स्वामीराया।।१।। मी आपुला भक्त अजाण। आपुल्याच कृपे घेतली आण। संकल्प सिध्दीस नेण्यालागून। शरण मी आपुल्या चरण पद्मा।।२।। व्यास म्हणती कमलासना। विरह विव्हल मुकुंदा अंगना। तिचे पुढील चरित्र कथना। करावे आपण आम्हासी।।३।। ब्रह्मदेव सांगती मुकुंदेची कथा। हृदयी तिच्या रुक्मांगद ठसा। झाला जीव तिचा वेडापिसा। कामाने ती झाली विव्हळ।।४।। साधली वेळ ही इंद्राने। रुक्मांगद काया धरिली त्याने। पाहुन मुकुंदा बेभान आनंदाने। घातली गळामिठी त्याला।।५।। घेऊनी तिचा यथेच्छ उपभोग। निघून मग गेला सुराधिप। जाहला शांत वियोग ताप।

जीव स्वस्थ झाला तिचा।।६।। इंद्रापासून तिज गर्भ राहीला। ऋषी न जाणती तिच्या कृत्याला। ऋषींना फार आनंद झाला। केला गर्भसंस्कार यथोचीत।।७।। मुकुंदेने प्रसवला सुपुत्र। करती ऋषी जातकर्म संस्कार। केले तयांनी त्याचे नामकरण। गृत्समद ऐसे नाव ठेवीले।।८।। योग्य वयस होता पुत्राला। मौजीबंधने त्यास संस्कारीला। गणेशमंत्राचा उपदेश केला। नित्य अर्चितसे तो गणेशाला।।९।। तेव्हा मग देशीचा भूपती। जगती तळी असे ख्याती। त्याचे दोन अमात्य सुमती। नीतीने राजसेवा करिती।।१०।। होती राजमंदिरी पितृतिथी। आमंत्रिले साऱ्या ऋषींप्रति। अत्रि वसिष्ठादि ब्राह्मण पंक्ती। यथा क्रमे त्याने बैसविल्या।।११।। अत्री म्हणती गृत्समदासी। आहेस तू तपोराशी। परी ब्राह्मणत्व नसे तुजसी। श्राध्दास योग्य नसशी तू।।१२।। झाला ऐसा घोर अपमान। लज्जेने खाली गेली मान। तैसाची गृत्समद घरी येऊन। आपल्या मातेस पुसतसे।।१३।। ती म्हणे रुक्मांगद नृप चक्रवर्ती। पाहुन मज झाली कंदर्प उत्पत्ती। झाल्या अनावर चित्तवृत्ती। तो नृपती मी भोगिला।।१४।। संतापे तो शापितसे मातेसी। होशील कंटकी तू महावनी। येशील फळभारे डवरोनी। परी प्राणी खग वर्जतील तुज।।१५।। ऐकोनी त्याचे शाप वचन। झाली मुकुंदा क्रोधायमान। म्हणे तू ही दैत्य होऊन। भये जन त्रासतील रे।।१६।। ऐसा परस्परे शाप झाला। झाली बदरी ती मुकुंदा। गृत्समद ही दैत्य

जाहला। गेला तो घोर वनांतरी।।१७।। आला तो घनघोर वनात। निर्झरोदके ते शोभिवंत। वसती तेथे ऋषी महंत। गृत्समद आला त्यांचे पाशी।।१८।। करुनी ऋषींच्या चरणी नमन। घेतले त्यांचे आशीर्वचन। पादांगुष्ठी उभा राहुन। तप गृत्समद करीतसे।।१९।। गणेशाचे ध्यान मनोमय। करी तप पंचदशशत। पाहुन त्याचे घनघोर तप। झाला गणेश प्रसन्न त्यासी।।२०।। कोटि सूर्य तेज प्रकाशमान। सिध्दिबुध्दि सहित झाला प्रसन्न। पाहता भये मूर्च्छागत होऊन। गृत्समद पडला भूवरी।।२१।। भीऊ नको म्हणे त्यास गणराज। मीच गणेश ओळख मज। होईल सिध्द तुझे काज। असे प्रसन्न मी तुजवर।।२२।। ऐकून गणेशाची मधुरवाणी। गृत्समद संतोषला मनी। घाली मिठी गणेश चरणी। म्हणे आज मी झालो धन्य।।२३।। गजाननास म्हणे गृत्समद। जरी संतुष्ट तू मजवर। देई मज तू ऐसा वर। जेणे होईन मी पावन।।२४।। म्हणे चवऱ्यांशी लक्ष योनी। त्यात उत्तम मानव जनी। मनुष्यात ब्राह्मण अनुष्ठानी। त्यामाजी ज्ञान श्रेष्ठ असे।।२५।। तूच असशी ज्ञान देवता। द्यावे ज्ञान मज दीनानाथा। छेदी मम मोहबंधन आता। करी कृतार्थ मज राया।।२६।। सर्वभूतीं असो भगवद्‌भाव। जिव्हेवरी सतत तुझे नाव। अखंड असावे भक्ति वैभव। हेच असे माझे मागणे।।२७।। आणिक एक मागणे असे। मजसी पुष्पक विमान दे। तू प्रसन्न झाला ते नगर हे। पुष्पनगर अलौकिक करवी।।२८।।

ऐकोनी मग म्हणे विश्वनायक। इच्छिले ते मिळेल सकळीक। विप्रत्व तुज लाभेल अलौकिक। वसिष्ठादिक मानितील तू तें।।२९।। तुझे स्मरण जे करती। ते संपूर्ण सिध्दीते पावती। तुझे बलाढय पुत्र त्रिजगती। बळे जिंकतील गृत्समदा।।३०।। रुद्रावाचोनी अनिवार। त्रिभुवनी होतील साचार। भोगोनी ऐश्वर्य समग्र। मत्पद पार पावतील ते।।३१।। कृती पुष्पक नामें हे नगर। त्रेती म्हणतील मणिपुर। द्वापारी भानक नामें साचार। कलियुगी भद्र नाम याचे।।३२।। येथे करिता स्नान अन् दान। जन पावती भवमोचन। ऐसी वरदोक्ती वदून। झाला गजानन अंतर्धान।।३३।। गणेश वरदें यज्ञकर्म। करिता झाला भक्तोत्तम। तेणें पावोनी सकलनाम। पुत्रोत्तम यज्ञी प्रगटला।।३४।। यज्ञी तेजस्वी बालक पाहुनी। गृत्समद म्हणे तया लागुनी। येणे सांग झाले कोठोनी। मातापिता कोण तुझे।।३५।। त्यास म्हणतसे तो बालक। तूची असशी माझा जनक। त्रैलोक्या कर्षणी नि:शंक। समर्थ एक मीच असे।।३६।। बालक म्हणूनी करी पालन। ऐकोनी ऐसे बालक वचन। गृत्समद मग हर्षित होऊन। नंदन मानी त्या बालकाते।।३७।। गृत्समद म्हणे बालकासी। त्रैलाक्य विजयी होण्यासाठी। जावे शरण गजाननासी। करितो तुज मंत्रोपदेश।।३८।। करुन पित्याकडून मंत्रग्रहण। वनी करितसे पुरश्चरण। पाहुन त्याचे तप निर्वाण। गजानन प्रगटला सन्मुख।।३९।। चतुर्भुज सुहास्य वदन। रेखिले भाळी दिव्यचंदन।

उदर शोभतसे लंबायमान। नागबंधन असे उदरावरी।।४०।। कर जोडूनी बालक करी विनंती। करुनी तू सौम्याकृती। पूर्ण कारी मम वांछित गती। त्रिजगती आधार तूच मम।।४१।। मंद हासुन वदे गजानन। अहोरात्र करिसी मम ध्यान। देण्यास तुजसी वरदान। सर्वेश्वर तो मीच असे।।४२।। बालक म्हणे त्रैलाक्याकर्षण शक्ती। द्यावी मजसी गणपती। सुरासुर आणि राक्षस पंक्ती। सेवेसी लावाव्या माझे।।४३।। इहलोकी सर्व भोग भोगून। अंती त्वत्पद मी पावेन। हा असे मम हेतू गजानन। पूर्ण करुनी सुखी करी।।४४।। येथे मी तप केले गहन। हे गणेशपुर नामाभिधान। व्हावे जगी विख्यात येथून। गजानना बा करी तू।।४५।। त्याचे मस्तकी वरदहस्त ठेवून। गणेश बोले प्रसन्न वदन। तू त्रैलोकी विजयी होऊन। अंती मत्पदा पावशील।।४६।। शंकरा वाचोनी विजयी सदा। होऊनी भोगशील सुखसंपदा। न कधी येईल तुज आपदा। वर हा माझा सत्य सत्य।।४७।। जे जे मनी तू इच्छशील। ते ते मत्प्रसादे पावशील। एके बाणे तुज शंकर भेदील। कैवल्यपर तू होशील।।४८।। मग तो त्रिपुरासुर। करी तेथे गणेश मंदिर। काश्मिर पाषाण मूर्ती सुंदर। वेदोक्त मंत्रे प्रतिष्ठा करी।।४९।। बंगालदेशी त्रिपुरासुर। करुनिया गणेशपूर। चालवीतसे राज्यभार। राजे समग्र जिंकुनीया।।५०।। आक्रमोनिया सकल अवनी। प्रवेशे तो स्वर्ग भुवनी। सेनेसह जाऊन नंदनवनी। क्रीडा करी तो असुर।।५१।।

नंदनवनाचा करुनी विध्वंस। मग बोलावूनी दूतांस। मदोन्मत्त म्हणे त्यांस। जाऊनी शक्रा सांगावे।।५२।। दासभावे जरी शरण येशी। तरीच संसारी सुख पावशी। शौर्य गर्व जर असेल तुजसी। करावे मज समवेत युध्द।।५३।। इंद्र सांगे दूतांसी। जाऊनी सांगा त्रिपुरासुरासी। तुज ऐसे मशक किती। पाठविले मी अंतकपुरी।।५४।। इंद्रे धरुनी वीरवृत्ती। येत आहे तो समराप्रती। हे जाणोनी दैत्यपती। सेना निगुती करी सिध्द।।५५।। त्रिपुरासुरे पृथ्वी जिंकिली। विभागले सैन्य तीन भागी। भीमकायास ठेवीले पृथ्वीवरी। वज्रदंष्ट्रास धाडीले पाताळासी।।५६।। भीमकाये विध्वंसिले नंदनवन। पाचारीले इंद्रास युध्दा लागुन। झाले उभयतांचे तुंबळयुध्द। दैत्य सैन्य झाले पराभूत।।५७।। मग आला त्रिपुर युध्दा लागून। दोघात माजले युध्द तुंबळ। त्रिपुरे पाडीले इंद्राचे वज्र। झाला तेणे इंद्र निःशस्त्र।।५८।। त्रिपुरे वज्र उचलीले। ऐरावताच्या मस्तकी हाणीले। 'ची ची' करत ऐरावत सरे मागे। इंद्र मग खाली उतरला।।५९।। इंद्र त्रिपुरात झाले मल्लयुध्द। करती उभय कठोर प्रहार। हाती पायी चालले युध्द। त्रिपुराने पकडले इंद्राचे पाय।।६०।। इंद्रासी फिरवी त्रिपुर गरगर। देतसे त्या फेकून दूरवर। देवांनी शोधीले इंद्रास जाऊन। केले औषधोपचार त्यावरी।।६१।। देव गेले हिमालय पर्वत दरीत। बैसले लपून देव तेथेच। त्रिपुर प्रवेशे करी अमरावतीत। झाला विराजमान सिंहासनी।।६२।। ब्रह्म देवास

समजले हे वृत्त। बैसला लपून तो कमळात। विष्णु दडला क्षीरसागरात। त्रिपुरे दोन मानस पुत्र निर्मिले।।६३।। एक चंड त्यास दिला ब्रह्मलोक। दुजा प्रचंड मिरवी विष्णुलोक। मग त्रिपुर आला शंकरा प्रत। गदगदा हलवी तो कैलास।।६४।। पार्वती होतसे भयभीत। परी शंकर झाले प्रसन्न। म्हणती त्रिपुरास घे वर मागून। तयाने कैलासपर्वत मागितला।।६५।। शंकरे त्यास कैलास पर्वत दिला। आपण मंदार पर्वतास गेला। इकडे भीमकाय त्रासितसे पृथ्वीला। राज्यांकडून तो घेई खंडणी।।६६।। पृथ्वी वरील धर्म कृत्ये बंद पाडून। तपाचरणी ऋषींस बंदीस्त करुन। नाना दुराचार धुमाकुळ माजवून। राक्षसी राज्य सुरु केले।।६७।। वज्रदंष्ट्र गेला पाताळ लोकी। पराभूत केले शेष वासुकी। पळवी उत्तम रत्ने स्त्रीयांसी। अर्पी आणून त्या त्रिपुरासी।।६८।। इकडे नारद वदे देवांसी। त्रिपुरे तपश्चर्या केली गणेशाची। परी तेणे दिला वर त्रिपुरासी। शंकर हस्ते तव वध होईल।।६९।। तुम्हीही करावे प्रसन्न गणेशासी। नारदे एकाक्षर मंत्र दिला देवांसी। देव तपश्चर्या करती गणपतीची। झाला प्रसन्न गणेश त्यांसी।।७०।। गणेश ब्राह्मण वेषे गेला त्रिपुरा कडे। त्रिपुराने तयास उच्चासनी बसविले। येण्याचे कारण नम्रत्वे विचारले। विचारी त्यास तू कोण असशी।।७१।। गणेश म्हणे मी असे कलाधर। अभ्यासिल्या मी कला चौसष्ट। लोक कल्याणास्तव फिरे त्र्यैलोक्यात। आलो मी तव

दर्शनासाठी।।७२।। त्रिपुर म्हणे नाम तव कलाधर। असती जर तुज कला अवगत। कला तव पाहून जर झालो प्रसन्न। अर्पिन मी माझे स्वप्राणही।।७३।। कलाधर म्हणे देतो विमाने तीन। विमाने जाशील क्षणार्धात सर्वत्र। इच्छिले सर्व होईल तुज प्राप्त। अशी उत्तम विमाने असतील।।७४।। कुणीही न भेदू शकेल विमान। असेल परी ते शंकरास साध्य। जेव्हा करील तो विमानभेद। तात्काळ तव नाश होईल।।७५।। कलाधरे अर्पी विमाने त्यासी। पाहुन आनंद झाला त्रिपुरासी। म्हणे मी प्रसन्न झालो तुजसी। इच्छित ते माग आता।।७६।। कलाधर सांगे त्रिपुरासी। चिंतामणी मूर्ती असे कैलासी। जर ती आणून देशी मजसी। अत्यानंदित होईन मी।।७७।। त्रिपुर म्हणे मी प्रसन्न क्षणार्धात जाईन कैलासी। देईन आणून मूर्ती तुजसी। षोडोशोपचारे पूजून विप्रासी। दशग्राम अन् बहुमोल वस्तु दिल्या।।७८।। नंतर त्रिपुर पाठवी दूतासी। तो चिंतामणी मूर्ती मागे शिवासी। शंकर कोपून वदे दूतासी। आहेस दूत म्हणून वाचलास।।७९।। शंकर सांगे त्रिपुर दूतासी। सांग जाऊन तू त्रिपुरासी। जन्मजन्मांतरी न मिळेल तुजसी। ऐकून त्रिपुर संतापला।।८०।। चतुरंग सेना जमवून आपली। करी स्वारी मंदारगिरी वरती। गणेशा न पूजता शिव ये युध्दासी। घनघोर युद्ध तेथे माजले।।८१।। चालले युध्द बहुत दिवस। शंकर त्रिपुर आले सामोरासमोर। झाला त्यांच्या युध्दास प्रारंभ। झाले

तुंबळयुध्द तयांमध्ये।।८२।। कार्तिकेय, प्रचंड, नंदी अन् चंड। पुष्पदंत, भीमकाय, भृंगी, कालकूट। वरीभद्र, वज्रदंष्ट्र, इंद्र, त्रिपुरप्रधान। जयंत आणि त्रिपुरपुत्र।।८३।। बृहस्पती समवेत शुक्राचार्य। लढती ऐसे सर्व देव दानव। अतिशय घनघोर माजले युध्द। भीडले रणवीर एकमेकांसी।।८४।। देव दाखविती आपला पराक्रम। त्रिपुर सैन्याचा झाला पराभव। दशदिशा पळाले असुर सैनिक। शंकरगण तया पाठी धावती।।८५।। पाहुन अति संतापे त्रिपुर। सोडीले त्याने पर्जन्यास्त्र। शंकराने सोडीले वायु अस्त्र। दैत्य सैन्याची झाली दाणादाण।।८६।। त्रिपुराने सोडीले पन्नगास्त्र। सर्प चोहीकडे झाले उत्पन्न। सर्प भक्षिती वायु संपूर्ण। त्रिपुरे मग अग्न्यास्त्र सोडले।।८७।। ज्वाळातुन बाहेर येई पुरुष। देव सैन्याचे करी तो भक्षण। देव शंकरा मागे बसले दडून। शंकराने पर्जन्यास्त्र सोडले।।८८।। काल पुरुषास शंकराने पाडीले। परी तो फिरुन उठला वेगे। शिवगणांना त्याने खाऊन टाकले। एकटा शंकर उरे रणांगणी।।८९।। शंकर मग गेला पळून। गिरीकंदरात तो बसला लपून। पार्वती एकटी असेल म्हणून। तिला पळविण्या त्रिपुर गेला।।९०।। झाले पार्वतीस ज्ञात आधीच। गेली हिमालया कडे ती मग। गुप्तजागी दडवी हिमालय तीज। त्रिपुर शोध घेई पार्वतीचा।।९१।। त्रिपुर शोधितसे पार्वतीसी। तयास चिंतामणी मूर्ती सापडली। आनंदे घेऊन निघाला मूर्तीसी। एकाएकी मूर्ती झाली नाहीसी।।९२।।

झाला फार मोठा अपशकून। त्रिपूर मनी झाला खिन्न। मनात झाला भयभीत फार। म्हणे आता काय करावे।।९३।। त्रिपुरे पराभविले देवांस। त्रिखंडात माजला अधर्म फार। यज्ञयागादि कर्मे पडली बंद। शंकरासह देव आले नारदाकडे।।९४।। नारद म्हणे तेव्हा शंकरासी। नाही पूजीले तू गजाननासी। जर त्रिपुराचा नाश इच्छिसी। गजाननासी घे करुन प्रसन्न।।९५।। नारदास मग शंकर म्हणे। बोलणे तुझे आहे खरे। 'षडक्षर' 'काक्षर' ऐसे मंत्र। गजाननाचे मज होते दिले।।९६।। परी युध्दास जाण्यापूर्वी। त्या मंत्रांचा जप केला नाही। म्हणूनच झाला पराभव रणी। जप विसरलो हेच कारण।।९७।। जाई शंकर दंडकारण्यी। बैसला पद्मासनात एकांती। निराहार दशवर्षे पर्यन्त। बैसला सदाशिव ध्यानस्थ।।९८।। होईल प्रसन्न त्यास गजानन। लाभेल सदाशिवास वरदान। तत्प्रसादे होईल विघ्नहरण। शिवाने गणेश उपासना केली।।९९।। स्तवावे कैसे ऐशा गणेशा। अगाध असे ज्याचा महिमा। द्यावी मति नवशतीत आणण्या। शरण तुजसी मी समर्था।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।। अध्याय चवथा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री गणेश करुनी वंदन। मनी करुनी स्वामी स्मरण। करितो गणेश नवशती लेखन। कार्य पूर्ण करण्या द्यावी मती।।१।। लाभता गणेश कृपा विशेष। मस्मकी असता स्वामी वरदहस्त। होईल कार्यसिध्दी निश्चित। विश्वास ऐसा माझे मनी।।२।। गेला शंकर दंडकारण्यी। बैसला पद्मासनात एकांती। दशवर्षे तपश्चर्या केली। तेव्हा एक चमत्कार झाला।।३।। पाच मुखे आणि दहा हात। गळयात माळा मस्तकी चंद्र। वागवितो सर्पाचे भूषण। सूर्यासम असे अत्यंत तेजस्वी।।४।। ऐसा एक अति दिव्य पुरुष। निघाला शंकराच्या मुखातून। शंकरास म्हणे तो दिव्यपुरुष। माझे स्वरुप असे अगाध।।५।। ऋषी न जाणती मम स्वरुप। ब्रह्मदेव जाणण्या असे असमर्थ। उपनिषदे ही न जाणती मज। मीच सृष्टीचे

पालन करतो।।६।। मी तुजवर झालो प्रसन्न। घे वर मागून मजकडून। झाला शंकरास अत्यानंद। गजानन स्तुती तो करीतसे।।७।। शिव म्हणे मी झालो धन्य। माझी सर्व मुखे झाली पावन। पृथ्वी उदक वायु तेज आकाश। गंध रस रुप स्पर्श अन् शब्द।।८।। समस्त इंद्रीये आणि मन। यक्ष गंधर्वादि सृष्टी सकल। निर्मिली तू रजोगुणे करुन। तमोगुण संहार तूच करसी।।९।। सत्त्वगुणे तू पालन करसी। परी गर्व नसे तुजसी। कर्तेपण न शिवे तुजसी। कूटस्थ साक्षी तू असशी।।१०।। शंकराची ऐसी स्तुती ऐकून। गणपती त्यास झाले प्रसन्न। म्हणे मी तुझे संकट हरीन। मम बीज मंत्रे अभिमंत्री शर।।११।। तो शर सोड त्रिपुर पुरांवर। पुरे त्याची होतील नाश। मग त्याचे तू भस्म करशील। होशील विजयी रणांगणी।।१२।। गणेश सहस्त्रनामे सांगे शिवासी। त्यांचे फळही सांगे त्यासी। या सहस्रनाम जप कर्त्यासी। कार्यात यश प्राप्त होईल।।१३।। युध्द समयी करता जप। होईल रणी शत्रु पराभव। नामाचा पाठ करता त्रिकाल। अभिष्ट सिध्द प्राप्त होते।।१४।। झाला शंकर अति आनंदित। उभारिले तयाने गणेश मंदिर। आजुबाजुस वसविले शहर। मणिपूर नाम दिले शहरासी।।१५।। व्यास म्हणती ब्रह्मदेवासी। गणेश सहस्त्रनामा कथिले शिवासी। ते तू आता सांग मजसी। समस्त विश्वकल्याणकारक असे ते।।१६।। ब्रह्मदेव मग सांगे व्यासांसी। सहस्रनामची देवता गणपती। छंद

‘पुष्कळ’ आहे त्यासी। ‘गम्’ हे त्याचे मूळ बीज।।१७।। ‘तुडे’ त्याची शक्ती असे। ‘स्वाहा’ त्याचे कीलन आहे। संपूर्ण नष्ट होण्या विघ्ने। सहस्रनामाचा जप करावा।।१८।। ‘गणेश्वर गणकिडा करुन आंरभ। अनंतनामा, अनंत, श्री अनंत। ‘मुनिसंस्थित’ ऐशा नामे शेवट। करावे असे गणपती सांगे।।१९।। उषःकालि करिता पठन। सर्व सुखे प्राप्त होतील। आयुरारोग्य आणि धन धान्य। सर्व सामर्थ्ये लाभतील।।२०।। जेथे या स्तोत्राचा असे जाप। तेथे नसेल टोळधाड दुष्काळ। नित्य पठन जो करील घरात। लक्ष्मी वसे सदा तेथे।।२१।। या स्तोत्राचे करिता पठन। जाईल त्याचे दारिद्रय नासून। होईल सर्वदा सुखी संपन्न। अशी वरदवाणी गणेशाची।।२२।। विनायक आणि एक सांगे। गणंजयादि एकवीस नामें। चिंतन करील जो मनःपूर्वके। सहस्रनाम फल प्राप्त त्यासी।।२३।। गजानने शंकरास वर दिधला। शंकरास बहु आनंद झाला। म्हणे युध्द समय प्राप्त झाला। सर्वदेवांनी चला मज सवे।।२४।। ब्रह्मा, कुबेर, अग्नी, यम। विष्णु, वायु, चंद्र,सुर्य, वरुण। गंधर्व, यक्ष, नवग्रह, किन्नर। सर्व सज्ज होऊन निघाले।।२५।। त्रिपुरास कानी लागली वार्ता। जमविली त्याने असुर सेना। शस्त्र तयांसी देऊनी नाना। निघण्या युध्दास आज्ञापिले।।२६।। रणगर्जना करीत असुर सेना निघे। समोरा समोर ठाकिली सैन्ये। घनघोर युध्द सुरु जाहले। महावीर पडती धारातीर्थी।।२७।।

देव सैन्याचा झाला नाश बहुत। इंद्रास चढला फार कोप। इंद्र धारण करी रौद्र स्वरुप। वज्रे प्रहार करी असुरावरी।।२८।। इंद्र पराक्रमे देवसैन्या चढे स्फुरण। पडती तुटुन ते असुरसैन्यावर। त्रिपुरे अभिमंत्रुन सोडल बाण। झाले त्याचे हजारो बाण।।२९।। सर्वबाण झाकिती सूर्यास। सर्वत्र झाला अंधार गडद। पाहून सैन्य झाले मूर्च्छित। झाला शिव बहु चिंताग्रस्त।।३०।। शंकराने पृथ्वीचा केला रथ। चंद्र सूर्याची चाके जोडिली त्यास। सारथी केले ब्रह्मदेवास। अश्विन कुमारांचे केले घोडे।।३१।। त्या घोडयांना जुंपले रथास। केला मेरुचा त्याने धनुष्य। मग करुनी विष्णुचा बाण। झाला सिध्द तो युध्दास।।३२।। मग शंकरे केला सहस्त्रनाम जप। नंतर केला एकाक्षर मंत्र जप। विष्णुरुपी बाणाचे करुन पूजन। शंकराने अभिमंत्रण केले।।३३।। होई महादेव रथात आरुढ। हाती धनुष्यबाण घेऊन। बैसला युध्दास सज्ज होऊन। ब्रह्मदेवे रथ त्रिपुरासमोर आणला।।३४।। त्रिपुर आणि शंकर उभय। वर्षती बाण एकमेकांवर। शंकरे मग सोडला विष्णुबाण। त्याचे प्रकाशे त्रिपुर मूर्च्छित झाला।।३५।। त्रिपुराची तिन्ही पुरे झाली भस्म। ज्योती निघाली त्रिपुर शरीरातून। तिने शंकरशिरी केला प्रवेश। त्रिपुरासुर मुक्त झाला।।३६।। तेव्हा झाली दिव्य आकाशवाणी। शिवावरती देव करती पुष्पवृष्टी। यज्ञयागादि प्रारंभती ऋषी। देवांनी आनंदोत्सव केला।।३७।।

शंकराने केले गणेशपूजन। केला त्याने सहस्त्रनाम जप। गणेशकृपे तेणे वधिला त्रिपुरासुर। म्हणून त्रिपुरारी म्हणती तया।।३८।। वध हा केला कार्तिक पौर्णिमेसी। म्हणून सर्वत्र दीपोत्सव या दिवशी। दान, जप, होम, करता या मासी। पुण्य त्याचे 'बहुल' मिळे।।३९।। 'बहुल' मास म्हणती या मासासी। बहुल पौर्णिमा नाम या पूर्णिमेसी। न केला दीपोत्सव या दिवशी। पुण्यक्षय तयाचा होत असे।।४०।। प्रात:काली स्मरण करता शिवाचे। पाप नाहीसे होते दुपारचे। माध्यान्ह पूजनी आजन्म पाप जाते। प्रदोष करता सात जन्मांचे।।४१।। इकडे मंदार पर्वतावरुन त्रिपुर गेला। पार्वतीने शंकराचा शोध केला। परी शंकर न सापडे तिजला। बहुविलाप ती करत होती।।४२।। शंकर भक्त धीवराने विलाप ऐकला। जाऊन सांगे तो हिमालयाला। हिमालय तात्काळ मंदारासी आला। पार्वतीचा शोध केला त्याणे ।।४३।। हिमालय मग सांगे कन्येला। अमंगळ तू मनी आणशी कशाला। शिवाशी तव वियोग होई कैसा। लवकरच मी भेट घडवीन।।४४।। हिमालय पार्वतीस नेई घरी। न स्वस्थ होई पार्वती। पूसे उपाय ती पित्यासी। हिमालय 'गणेश उपासना' सांगे।।४५।। करावे प्रभाते मंत्र युक्त स्नान। रेखावे भाळी भस्म चंदन कुंकुम। मग उत्तम मृदू माती घेऊन। गजानन प्रतिमा तयार करावी।।४६।। असावी मूर्ती सर्वांग सुंदर। असावी परशु आदि शस्त्रे हातात। मग स्थापना करावी

पाटावर। मग पूजा, द्रव्ये मेळवावी।।४७।। जल,अष्टगंध,अक्षता,तांबडी फुल। १०८ दुर्वा, तुपाचे तेलाचे दिप। नैवेद्यास लाडु, मोदक, घारगे, खीर। ऐसे सर्व साहित्य असावे।।४८।। मग घ्यावे वस्त्र अथावा दर्भासन। बसावे घालुन पद्मासन। करावे गणपती अन् देवता स्मरण। सभक्ती षोडशोपाचारे पूजन करावे।।४९।। करावा मग सहस्रनाम पाठ। म्हणती सूक्ते अन् गणेशस्तोत्र। प्रार्थावा मनःपूर्वक श्री गणेश। विनवावे 'व्हा प्रसन्न' मजवर।।५०।। गणेश मंत्र पार्वतीस नसे ठाऊक। हिमालय म्हणे मंत्र असती अनेक। घे तू एकाक्षर वा षडक्षर मंत्र। शुध्द चतुर्थीस जप प्रारंभ करी।।५१।। करुन ऐसे एक मास अनुष्ठान। तुझी मनोकामना होईल पूर्ण। शंकरासवे तुझी होईल भेट। बहु फलदायक असे हे पूजन।।५२।। स्त्रिया असो अथवा पुरुष। मृत्तिका मूर्ती पूजतील भक्त। त्यांना लाभे धन, पुत्र, पशुधन। होतील सुखी ते जीवनी।।५३।। गणेश मूर्ती करावी सुवर्णाची। रुपे, तांबे, कास्य, मौक्तिकाची। अथवा मूर्ती करावी प्रवाळाची। तेणे सिध्दी लवकर लाभेल।।५४।। भाद्रपद शुक्ल चतुर्थी दिनी। गणेशोत्सव साजरा करावा सर्वांनी। षोडशोपचारे पूजन दुसरे दिनी। होम करुनी पुर्णाहूती द्यावी।।५५।। नंतर आचार्यांचे करुन पूजन। त्यांस गाई, वस्त्रे वगैरे दान। करावे नंतर दांपत्य पूजन। सांयकाळी मूर्तीचे विसर्जन करावे।।५६।। ऐसे गणेश पूजन फलदायक। करावे

भक्तियुक्त मन:पूर्वक। होईल सर्व संकटांचा नाश। गणेश प्रसन्न होईल त्यासी।।५७।। सांगतो आता पुढील वृत्तांत। हिमालय म्हणे पार्वतीस। ऐसेच असे गणेश चतुर्थीव्रत। मनोभावे तू श्रवण करी।।५८।। एके दिनी कैलास पर्वती। आनंदी बैसले होते पशुपती। कार्तिकेय त्यांस करी विनंती। सकल सिध्दीप्रद व्रत सांगावे।।५९।। शंकर म्हणती कार्तिकेयासी। सिध्दिविनायक व्रत सांगतो तुजसी। होम, जप, जाप्य, दान नको यासी। अतिशय पुण्यप्रद हे व्रत असे।।६०।। भाद्रपद शुक्ल चतुर्थी दिनी। जावे गुरुप्रती स्नान करुनी। गुरुपूजा गणेशाराधना करुनी। घ्यावा व्रतोपदेश गुरुंकडुनी।।६१।। मग जाऊन अतिपवित्र स्थानी। अंगास आवळा, तीळ, कल्क लावूनी। पवित्र जली मंगलस्नान करुनी। करावे दररोज गणपती पूजन।।६२।। किंवा श्रावण शुध्द चतुर्थी पासून। भाद्रपद शुध्द चतुर्थी पर्यंत। करावे ब्रह्मचर्य व्रताचे पालन। दररोज गणपती पूजन करावे।।६३।। करावा उपवास अथवा एकभुक्त। नक्त वा अयाचीत वृत्ती युक्त। अथवा करावे हविष्यान्न भोजन। दिवसाच्या चतुर्थ भागात।।६४।। गुरुंनी दिलेल्या मंत्राचा जप। करावा लक्ष अथवा दशलक्ष। नाहीतर निम्मा करावा जप। अहोरात्र गजानन ध्यान करावे।।६५।। भाद्रपद शुक्ल चतुर्थी दिनी। उंदिरारुढ सुवर्ण गणेशमूर्ती करुनी। मखरात ध्यान कलशावर ताम्हण ठेवूनी। तांब्यात पंचरत्ने

पंचपल्लव घालावी।।६६।। कलशास मग वस्त्राने वेष्टूनी। नंतर षष्ठीपूजा करुनी। कलशावर गणेशाची स्थापना करुनी। गजाननाचे भावे पूजन करावे।।६७।। अनेक द्रव्ययुक्त करावा होम। मनोभावे करावे आचार्य पूजन। गुरुस गो, भूमी, सुवर्ण, तील, दान। अन्य द्विजांसही दक्षिणा द्यावी।।६८।। द्यावे एकशे आठ ब्राह्मणा भोजन। दीन दरिद्रयांना करा अन्नदान। द्विजांस तांबुल दक्षिणादि देऊन। तयांचे घ्यावे आशीर्वाद।।६९।। मग करावे आप्तेष्टांसह भोजन। नंतर धारण करावे मौन। ऐसे व्रत केल्यास आचरण। व्रतधारकास लाभे मुक्ती।।७०।। शंकरास विचारी कार्तिकेय। पूर्वी कोणी केले हे व्रत। कैसे व्रतफल मिळाले त्यास। संपूर्ण मजसी कथन करावे।।७१।। शिव म्हणती होता कर्दमनृप। आले भृगुऋषी त्याचे राज्यात। त्याने पूजा करुन केला प्रश्न। कोणते पुण्ये मज पृथ्वीराज्य मिळाले।।७२।। भृगु सांगती त्या राजास। पूर्वजन्मी तू होता गरीब क्षत्रिय। कुटुंबास्तव करिशी नाना उघोग। पण नव्हते यश तुजलागी।।७३।। दारिद्रयामुळे कलत्र पुत्र निंदिती। झालासी तू अतिशय दु:खी। मग वनी गेलास निघुनी। तेथ तुज सौभरी ऋषी भेटले।।७४।। केलेस तू त्यांना नमन। त्यांनी तुज पुसीले दु:खकारण। कथिला त्यांनी निवारण उपाय। वरद गणेशाचा जप सांगितला।।७५।। मग तू पूसीलेस तयांसी। सांगावी गणेशाची माहिती। म्हणती त्यापासूनच जगदुत्पत्ती। ऐसे असे

गजानन स्वरुप।।७६।। तयापासून ॐकार, वेद, जग, उत्पन्न। ब्रह्मदेवे केला तयाचाच जप। तयानेच दिले सृष्टि रचना सामर्थ्य। विष्णु सुध्दा त्याचा मंत्र जपे।।७७।। करी श्रावण शुध्द चतुर्थी पासून। भाद्रपद शुक्ल चतुर्थी पर्यंत व्रत। म्हणजे होतील सर्व सिध्दी प्राप्त। चिंता मुळी तू करु नको।।७८।। त्याप्रमाणे आचरिलेस तू व्रत। नाना सुख संपदा झाली प्राप्त। शेवटी मग गणेशलोका प्रत। गमन तो करिता झाला।।७९।। शंकर सांगती कार्तिकेयासी। देव, दानव, गंधर्व, मनुष्य ऋषी। जयांनी आचरिले या व्रतासी। तयांसी सिध्दि झाली प्राप्त। ।८०।। हिमालय म्हणे पार्वतीस। गजानन चरणी ठेवी भाव। करी या व्रताचे आचरण। तुज पती दर्शन होईल।।८१।। पार्वती पुसतसे नल हा कोण। पराक्रमी नृप असे तो ज्ञानसंपन्न। त्याने केल्या विद्या संपादन। त्रैलोक्य गमन बल असे त्यास।।८२।। तयाची दमयंती भार्या सुंदर। सुंदर स्त्रियांचे करी गर्व दमन। म्हणूनी तिचे दमयंती नाम। अतिशय सुंदर होती ती।।८३।। राजाचा प्रधान पद्महस्त। असे मतिमान नीति संपन्न। राजसभेत आला ऋषी गौतम। गेला सामोर राजा त्यासी।।८४।। राजा विचारी त्या ऋषीशी। ऐसी कोणती पुण्यराशी। जेणे सुखोपभोग प्राप्त मजसी। कृपा करुन सांगावे मज।।८५।। सांगती ऋषी पूर्वजन्म कथा। तो गौड देशी दीन क्षत्रिय होता। त्रासूनी तो गेला निबीड कानना। तेथे कौशिक ऋषी भेटले त्यास।।८६।।

तयांनी गजानन व्रत कथिले त्यासी। भक्तिभावे तेणे आचरिले व्रतासी। लागला गजानन ध्यास त्यासी। त्याचे कृपे दारिद्र्य नष्ट झाले।।८७।। तू पूर्वजन्मी केली गजानन पूजा। झालासी म्हणूनी चक्रवर्ती राजा। लाभले नाना भोग तुजला। राजैश्वर्याचा भोग घेसी तू।।८८।। सांगे हिमालय पार्वतीसी। राजा चंद्रांगद महावैभवशाली। केले त्याने यज्ञ अन् दानधर्मही। पत्नी तयाची इंदुमती असे।।८९।। गेला तो मृगयेस एके दिनी। पडली दृष्टीस राक्षस टोळी। तयात एक राक्षसीण होती। झाली ती मोहीत राजावरती।।९०।। घेतले तिने राजास उचलून। घेतले तिने त्याचे मुखचुंबन। नंतर तयासी खाली ठेऊन। राज सैनिक भक्षण करु लागली।।९१।। हळूच राजाने तळयात उडी मारली। नागकन्या तेथे जलक्रिडारत असती। त्यांनी राजास नेले पाताळी। विचारीले राजास पूर्ववृत्त।।९२।। म्हणती मग त्या राजासी। कर विवाह तू आमच्याशी। करु पूर्ण आम्ही तव इच्छेसी। तेव्हा राज सांगे त्यांसी।।९३।। आम्ही सोमवंशी राजे एक पत्नी। परदारा परद्रव्य लोभ नसे आम्हासी। आचरितो आम्ही आमुचे धर्मासी। करितो आतिथ्य धर्माचे पालन।।९४।। मी तुमचा अतिथी असे। भलती गोष्ट करण्या सांगू नये। कुळाचारा पासून परावृत्त करु नये। हीच विनवणी असे माझी।।९५।। झाल्या नागकन्या बहु खिन्न। म्हणती असे तुझे जिच्यावर प्रेम। तियेचा वियोग व्हावा म्हणून। तुज

कारागृही ठेवितो आम्ही।।९६।। नागकन्यांनी राजास केले बंदिस्त। दिधला तिजला कारावास। तेणे राजा राहीला पाताळात। पत्नी इंदुमतीस हे नसे ठाऊक।।९७।। इकडे राक्षसीने जाणले वृत्त। राजा शिरलाअसे तळयात। पिऊन टाकीले तिने सर्वजल। भक्षिले त्याली सर्व प्राणी।।९८।। राज सेवक आले राजधानीस। सांगितले इंदुमतीस वर्तमान। मूर्च्छित झाली ती वार्ता ऐकून। हा हा कार माजला राजधानीत।।९९।। राणी इंदूमतीची करुण कहाणी। वाचता नयनी दाटे पाणी। परी पहा गणेशााची ऐसी करणी। हरतील तिची सर्व दुःखे।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।। अध्याय पाचवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्था मी आपण शरण। करी मी गणेश उपासना वर्णन। गजानन महात्म्य करण्या वर्णन। द्यावे शब्द सामर्थ्य मजसी।।१।। श्री गणेश माहात्म्य असे सुंदर। कथांतून वर्णावे माहात्म्य अपार। श्री गणेश प्रत्यक्ष करुणासागर। गणेश महिमा कैसा वर्णावा।।२।। राजा चंद्रागद इंदुमती कहाणी। वर्णिता नयनी दाटे पाणी। कथा तीच वर्णिली पुढती। द्यावे ध्यान भक्तजनांनी।।३।। चंद्रागद लागला राक्षसा हाती। ऐकून प्रजा झाली दुःखी। आले सर्व राणी इंदुमती प्रती। झाले दुःखी पाहुनी तिजसी।।४।। प्रजाजन मग सांगती राणीसी। महाराज नक्की जींवत असती। येतील ते परतून निश्चित। ऋषीमुखे वर्तमान घेऊ जाणून।।५।। इंदुमतीस पटला हा विचार। आवरला तियेने आपला शोक। केला सर्व

उपभोगांचा त्याग। करु लागली ती तप कठोर।।६।। ऐसी बारा बर्षे सरुन गेली। नारदमुनी आले त्या नगरी। पतिवृत्तांत सांगे इंदुमती। नारद म्हणती पती असे जीवंत।।७।। झाली इंदुमती अति आनंदित। पति मिलनाचा ती उपाय पुसत। नारद उपदेशिती तिज गणेशव्रत। म्हणती करी व्रत भक्तिभावे।।८।। आनंदे करावी गणेशाची मृत्तिका मूर्ती। करावा प्रारंभ श्रावणशुध्द चतुर्थी। भाद्रपदशुध्द चतुर्थीपर्यंत निश्चित। करावा गणेशव्रत आनंदाने।।९।। आचारितसे गणेशव्रत इंदूमती। व्रतप्रभावे गेली नागकन्यांची दुष्ट मती। चंद्रागदाचे आतिथ्य केले त्यांनी। केले मुक्त त्यास बंदीवासातून।।१०।। दिधले वस्त्रालंकार चंद्रागदासी। चपळ घोडा दिधला त्यासी। मग बैसोनी त्या घोडयावरती। तलावा बाहेर चंद्रागद आला।।११।। नागरिकांस त्याची ओळख पटली। सारी प्रजा मुदित झाली। राजधानीत ही सुवार्ता गेली। प्रधानादि सैनिक आले सामोरे।।१२।। राजाच्या स्वागताची तयारी झाली। प्रजेने शुभ्र तोरणे उभारली। राणीने हाती पंचारती घेतली। राजास ओवाळण्या आली मंदिरी।।१३।। राणीने राजाचे स्वागत केले। पंचारतीने तिने राजास ओवाळले। तिने राजास व्रतमाहात्म्य कथिले। परम मुदित झाला राजा।।१४।। हिमालयाने पार्वतीस व्रत निवेदिले। पार्वतीने हे व्रताचरण केले। इकडे शंकर मन चंचल झाले। गणेश चतुर्थीस आला पार्वतीपाशी।।१५।। ब्रह्मदेव व्यासास शूरसेन कथा सांगती।

शूरसेन पत्नी पतिव्रतासती। राजा बैसला प्रधाना संगती। त्याने दिव्य प्रकाश पाहीला।।१६।। राजाने सेवकांस आज्ञा केली। पाहती ते राजवाडया बाहेर येवोनी। जातसे दिव्य विमान आकाशातूनी। कुष्ठी सेवक दृष्टी त्यावर पडली।।१७।। विमानाची गती मंद झाली। दिव्य ते विमान उतरे खाली। आला राजा विमाना जवळी। ते विमान होते इंद्र देवाचे।।१८।। राजा म्हणे इंद्र देवास। तव दर्शने धन्य झालो खास। परि आपण कोठे निघालात। विमान येथे का उतरविले।।१९।। इंद्र म्हणे एक अद्‌भूत वर्तमान। सांगितले नारदाने मजलागून। त्यामुळे गेलो भृशुंडी आश्रमात। खडतर तपश्चर्या केली त्यांनी।।२०।। तयांसी गजानन स्वरुप झाले प्राप्त। भेटून त्यांना निघालो परत। पापी सेवक दृष्टीने गती कुंठीत। झाली माझ्या विमानाची।।२१।। राजा मग विनवी इंद्रास। गेला आपण ऋषी दर्शनास। त्या ऋषींचे मंगल चरित्र। मजसी आपण निवेदावे।।२२।। इंद्राने सांगितली त्यांची कथा। दंडकारण्यानंद नगरात धीवर होता। तो चौर्यकर्मात पटाईत होता। लोकांना तो बहु पीडीतसे।।२३।। लोकांनी त्यास काढले नगरा बाहेर। सेविले तयाने अरण्य घनघोर। वाट मारीने केले द्रव्य संपादन। बायको मुलास अलंकारे शृंगारिले।।२४।। पशु मागे पळता त्या ठेच लागली। अडखळून पडला तो भूवरी। उठून चालू लागला सत्त्वरी। गणेशतीर्थ तयाने देखिले।।२५।। त्या सरोवरी केले स्नान। मग

तो निघाला तेथून। स्वर ऐकला 'गजानन गजानन'। मुद्‌गल ऋषी पाहीले समोरी।।२६।। मारण्या त्यांसी उचलले हत्त्यार। झाला इतक्यात चमत्कार। मुद्‌गला मारण्या उचलली तलवार। त्याचे हातून गळून पडली।।२७।। मुद्‌गलांनी विचारीले तयास। का तलवार खाली ठेवलीस। धीवर मग म्हणाला ऋषींसी। तुमचे दर्शने झाले मन शुध्द।।२८।। गणेशतीर्थी मी केले स्नान। त्यामुळे मम देह झाला पावन। आपला वध करण्या पूर्वीचा म्हणून। मम हातून तलवार गळून पडली।।२९।। मग तो सांगे मुद्‌गल ऋषींस। मी असे अति पापी दुष्टमती। असंख्य पापे घडली मम हस्ती। आपण आता उध्दार करावा।।३०।। ऋषींनी ठेवला मस्तकी हस्त। 'श्री गणेशाय नम:' ऐसा मंत्र। उपदेशिला त्या धीवरास। नंतर काठी भूमीत पुरली।।३१।। मुद्‌गल म्हणाले धीवरासी। अहोरात्र जपावे या मंत्रासी। पाने येई पर्यंत या काठीसी। वा मी येई पर्यंत करावा जप।।३२।। धीवर जपतसे गजानन मंत्र। हजार वर्षे पर्यंत केला जप। आली हिरवीगार पाने काठीस। धीवरा भोवती वारुळ झाले।।३३।। तरीही तो करीत होता जप। मुद्‌गल ऋषी आले अरण्यात। झाली त्यांसी धीवराची आठव। धीवराच्या स्थानी ते आले।।३४।। तयांनी मग तेथे पाहीले। काठीस आली हिरवीगार पाने। तिथेच एक वारुळ मोठे। 'श्री गणेशाय नम:' ध्वनी येई आतून।।३५।। ऋषींनी वारुळ बाजूस केले। मंत्र जपतसे धीवर तेथे।

त्यावर कमंडलू जल शिंपडले। धीवरास सोंडेसह गजानन रुप लाभले।।३६।। धीवराने मग नेत्र उघडले। त्याला श्रीगुरुंचे दर्शन झाले। साष्टांग नमने गुरुंस वंदिले। अत्यानंदे त्यांस मिठी मारली।।३७।। धीवराचा पुनर्जन्म वारुळातून झाला। मन नामकरण संस्कार केला। गणेशासम सोंड होती त्याला। म्हणून 'भृशुंडी ऋषी' नाम ठेवले।।३८।। ऋषी एकाक्षर मंत्र देती त्यास। आणि म्हणती भृशुंडी ऋषींस। इंद्रादिदेव, गंधर्व,सिध्द साऱ्यांस। तव दर्शनाने इच्छापूर्ती होईल।।३९।। गेले निघून मग मुद्‌गल ऋषी। आश्रम स्थापिती भृशुंडी ऋषी। करती तपश्चर्या गजाननाची। गजानन झाला प्रसन्न त्यांसी।।४०।। गणेशे दिधले तयांस वरदान। या क्षेत्रास 'नापल क्षेत्र' नाम। येथील मूर्तीचे घेता दर्शन। पुनर्जन्म त्यास येणार नाही।।४१।। मग शूरसेनाने इंद्रास विचारले। जाण्या वर हे विमान तुमचे। मी काय करु ते सांगावे। तुमची मदत कशी करु।।४२।। इंद्र म्हणती मग राजास। संकष्टी चतुर्थी कर्ता ब्राह्मण। एक वर्षाचे पुण्य करील अर्पण। त्या पुण्याने विमान वर उडेल।।४३।। राजा विचारी व्रताची देवता कोण। इंद्राने सांगितले राजास। कृतावीर्य राजा व नारद यांचा संवाद। आता मी तुज सांगतो।।४४।। कृतवीर्य व पत्नी होते सुसंपन्न। परी नसे तयांसी पुत्र संतान। पुत्राविना अति उद्विग्न होऊन। पत्नीसह अरण्यात गेला।।४५।। आचरले तयांनी घोर तप। देह दोघांचे झाले जर्जर।

पितृलोकी मग आला नारद। पुत्रावस्था पित्यास सांगितली।।४६।। परत येताना पाही नारद। भृशुंडीचे माता पिता नरकात। असह्य यातना होते सोसत। नारदाने हे भृशुंडीस सांगितले। ।४७।। भृशुंडी ऋषी झाले उद्विग्न। केला विचार डोळे मिटून। संकष्टी व्रताचे एक दिवसाचे पुण्य। अर्पण केले त्यांनी गजाननासी।।४८।। त्यांनी श्री गजाननास विनविले। मी संकष्टी व्रत निष्ठेने केले। त्याचे फल तुजसी अर्पण केले। करावा माता पित्यांचा उध्दार।।४९।। भृशुंडींनीं जल प्रोक्षण केले। त्यांचे सर्व पितर स्वर्ग लोकी गेले। एक दिवसाचे पुण्य इतके झाले। आजन्म व्रतीच्या पुण्ये विमान उडेलच।।५०।। इंद्रदेव कृतवीर्य कथा सांगितली। त्याचा पुत्र स्नुषा मरणोन्मुख झाली। कृतवीर्य पिता गेला ब्रह्मदेवा पासी। पुसे मम पुत्रास संतान का नाही।।५१।। ब्रह्मदेव म्हणे तव पुत्र होता अंत्यज। द्रव्यलोभे तेणे मारले बारा ब्राह्मण। परी तो होता माघ संकष्टी दिन। सांयकाळ पर्यंत तयास घडले उपोषण।।५२।। त्या व्रताने त्यास स्वर्ग लाभला। पुण्य संपता तो राजकुळात जन्मला। परी केला होती त्याने ब्रह्महत्त्या। त्यामुळे त्यास संतान नाही।।५३।। केले जर संकष्टीव्रत पालन। पूर्वजन्म पापाचे होईल क्षालन। होईल प्राप्त त्यास पुत्र संतान। संकष्टी चतुर्थी व्रत त्याने करावे।।५४।। संकष्टी दिनी असता मंगळवार। त्यापासून करावे व्रताचे पालन। उत्तम फळे तांबुल गणेशास अर्पून। आरती करुन ब्राह्मण भोजन

घालावे।।५५।। नंतर गणेश कथा श्रवण करुन। करावे प्रसन्न चित्ते भोजन। रात्री करावे नामसंकीर्तन। ऐसे एक वर्ष पर्यंत करावे।।५६।। श्रावणत लाडू भाद्रपदी दही। अश्विनात उपावास दूध कार्तिकी। मार्गशीर्षी निराहार पौषे गोमुत्र। माघी तीळ फाल्गुनी तुपसाखर।।५७।। चैत्रात पंचगव्य वैशाखी दुर्वारस। जेष्ठात घृत आषाढी मधसेवन। ऐसे रीती विविध पदार्थ सेवून। करावे हे व्रत वर्ष पर्यंत।।५८।। कृतवीर्यास ब्रह्मदेव सांगती। अंगारकीचे महत्त्व असे निश्चिती। तयास अंगारका कथा सांगती। कृतवीर्य भक्तिभावे। करी श्रवण।।५९।। भारद्वाज ऋषी तेजस्वी महान। करिती नित्य अग्निहोत्र पालन। देती सकला वेदविद्या ज्ञान। महान तपस्वी ते होते।।६०।। क्षिप्रा नदीत स्नान करित असता। पाहीली त्यांनी सुंदर अप्सरा। झाले कामातुर तिज पाहता। वीर्यस्खलन त्यांचे झाले।।६१।। ते वीर्य पृथ्वीने केले धारण। झाला त्यापासून पुत्र उत्पन्न। शरीर तयाचे तांबडे आरक्त। पुसे याचे कारण तो मातेसी।।६२।। पृथ्वीने सांगितले जन्मवृत्त। सांगे तो ने मज पित्याप्रत। पृथ्वी घेऊन गेली भारद्वाजा समीप। पुत्रास पाहून भारद्वाज आनंदला।।६३।। भारद्वाजाने केले त्याचे व्रत बंधन। करविले त्यास वेदाध्ययन। पितृ आज्ञेने केले तपाचरण। माघ शुध्द चतुर्थीस गजानन प्रकटला।।६४।। गजानन म्हणती तयासी। घे वरदान मागुन आजची। म्हणे व्हावे प्रसिध्द त्रिभुवनी। घडावे मज नित्य

अमृतप्राशन।।६५।। ज्या तिथीस झाला प्रसन्न। व्हावी ती तिथी मंगलकारक। ऐसा वर आपण द्या मज। गणेश 'तथास्तु'त्या म्हणती।।६६।। तयास म्हणती गजानन। देवांसह करशील अमृतपान। म्हणतील तुज पृथ्वी तनय। 'भौम' नाम मिळेल तुजसी।।६७।। तुझा असे हा आरक्तवर्ण। 'अंगारक' ऐसे म्हणतील म्हणून। माघ शुध्द चतुर्थीस झालो प्रसन्न। होईल ही तिथी मंगलकारक।।६८।। होती तेव्हा सोमवती चतुर्थी। तिचे महत्त्व असेल जगती। म्हणतील अंगारिका येता मंगळवारी। अंगारिका होईल विशेष ख्यात।।६९।। ऐसी कथा ब्रह्मदेव सांगती। कृतवीर्य श्रवण करी सभक्ती। ब्रह्मदेव पुढील कथा सांगती। कृतवीर्यास श्रवणी वाटे रती।।७०।। मी एकदा गेलो शंकराकडे। नारदमुनी तेथे होते आले। त्यांनी शंकरास फळ अर्पिले। शंकर पुत्र भांडती फळासाठी।।७१।। शंकराने ब्रह्मदेवास (मज) विचारले। म्हटले मी कार्तिकेयास द्यावे। गणपती कोपला त्या कारणे। नंतर मी स्वस्थानी आलो।।७२।। मी करीत असता सृष्टी उत्पत्ती। गणेश रौद्ररुपे मज भीवविती। पाहुन रौद्ररुप अन् माझी भीती। मौज वाटून चंद्र हसला।।७३।। कोपला गजानन त्या कारणे। रागाने त्याने चंद्रास शापिले। त्रैलोक्यी कुणीही दर्शन न घेतील। दर्शन घेणाऱ्यास पाप लागेल।।७४।। चंद्राचे सौदर्यं नष्ट झाले। लपून बसला चंद्र लज्जेने। सर्वदेवांस वर्तमान समजले। केली त्यांनी गणेश

प्रार्थना।।७५।। प्रसन्न गणेश उ:शाप देती। फक्त भाद्रपद शुक्ल चतुर्थी दिनी। चंद्रदर्शने येईल महाविपत्ती। बाकी दिनी चंद्रदर्शन घ्यावे।।७६।। नंतर गणेश म्हणे चंद्रासी। होईल सुंदररुप प्राप्त तुजसी। तव दर्शना नंतरच स्वीकारीन संकष्टीचे पूजेसी। तुझी कोर मस्तकी धारण करतो।।७७।। चंद्र मग प्रसन्न झाला चित्ती। गंगा पश्चिम तीरी स्थापिली मूर्ती। चंद्रकोर आहे मूर्तीच्या मस्तकी। भालचंद्र नाम झाले प्रसिध्द।।७८।। नंतर कृतवीर्याने प्रश्न केला। दुर्वा प्रिय का गजाननाला। सांगितली सुलभ समुद्र कथा। नेण्या त्यासी गणेशदूत आले।।७९।। मंदिरातील भक्तगण पाहती। कारण ते दूतांसी पुसती। दूत भक्त गणांस सांगती। नारदे कौण्डिण्यास ही सांगितली।।८०।। नारद सांगती यमतिलोत्तमा कथा। तिलोत्तमेस राक्षसपुत्र झाला। पृथ्वी जाळती त्याच्या नेत्रज्वाला । सर्वजण भयभीत झाले ।।८१।। आले सर्वजण विष्णु समिपी। विष्णुने मग सांगितले त्यांसी। होईल राक्षस वध गणेश हस्ती। तयासी प्रसन्न करुन घ्यावे।।८२।। गायिली सर्वांनी गणेशस्तुती। प्रकटला गणेश वाहक रुपी। अनलासूर आला त्या स्थानी । गेले सर्वजण पळुनी।।८३।। थांबला गणेश न भीता। गिळीले त्यांने अनलासूर राक्षसा। सर्वांगदाह त्यास होऊ लागला। उपाय करण्या इंद्रादि धावले।।८४।। मानसकन्या अर्पी ब्रह्मदेव। विष्णु अर्पितसे स्वहस्त कमल। केला वरुणाने उदकाभिषेक। शंकराने

नाग अर्पण केला।।८५।। अठ्ठयांशी सहस्र मुनींनी। तयार केली एकवीस दुर्वांची जुडी। प्रत्येकाने अर्पिली दुर्वांची जुडी। त्यामुळे दाह शांत झाला।।८६।। गणेशाने 'प्रशमन' केला अनलासूर। लाभले त्याला 'प्रशमन' नाम। देवालय निर्मून केली मूर्ती स्थापन। 'विघ्नहर गणपती' त्यास म्हणती।।८७।। कौण्डिण्य ऋषीपत्नी आश्रया। विचारिला तिने दुर्वा महिमा। सांगती कौण्डिण्य राजा जनक कथा। गणेशाने राजाचे गर्वहरण केले।।८८।। नंतर गणेश गेले भक्ताघरी। त्या दांपत्याने त्यास दुर्वा अर्पिली। प्रसन्न होऊन गणेश वर देती। दांपत्याने गणेशभक्ती मागितली।।८९।। कौण्डिण्याने पत्नीस एक दुर्वा दिली। म्हणाले जा घेऊन इंद्राजवळी। इंद्र तिज कुबेराकडे पाठवती। तिने दुर्वेच्या भारंभार सोने मागितले।।९०।। कुबेराने केली दुर्वेची तुला। त्याचा सारा सुवर्णसाठा संपला। तराजुत त्याने बसविले पत्नीला। तो स्वतः तराजुत बसला।।९१।। पाचारण केले मग इंद्राला। हत्तीसह तराजुत बैसविले त्याला। बैसविले विष्णुला अन् शंकराला। परी दुर्वेचे पारडे जडच राहिले।।९२।। चमत्कार पाहुन आले कौण्डिण्यां कडे। म्हणती दुर्वेचे महत्त्व आज कळले। दुतांनी भक्तगणांस सांगितले। भक्तांनी दुर्वेने गणेशपूजा केली।।९३।। कृतवीर्य पिता पुत्राच्या स्वप्नी गेला। संकष्टी माहात्म्य कथिले त्याला। कृतवीर्य स्वप्नातून जागा झाला। त्यास तेथे पोथी सापडली।।९४।। राजधानीस तो

करी गमन। विचारी पंडितांसी पोथी दाखवून। ते म्हणती हे असे व्रतमाहात्म्य। राजाने व्रताचरण सुरु केले।।९५।। शूरसेने पूसिले व्रतविधान। इंद्र म्हणे करावे पूर्ण दिन उपोषण। चंद्रच दर्शना नंतर करावे गणेश पूजन। नामोच्चारे अर्पाव्या एकवीस दुर्वा ।।९६।। कार्तिकेयासाठी केले व्रत पार्वतीने। समुद्र पाशनापूर्वी केले अगस्तीने। नल प्राप्तीस्तव केले दमयंतीने। पदयुम्ने केले अनिरुध्दा साठी।।९७।। करावे उद्यापन प्रथम वा पंचम मासी। अथवा करावे सातव्या मासी। गणेश पूजन करुन नैवेद्य द्यावा चंद्रासी। गजाननासी नैवेद्य दाखवावा।।९८।। त्यानंतर करावा होम। होमासी बैसवावे एकवीस ब्राह्मण। 'गणनां....' मंत्रे करावे दशसहस्र होम। हजार, पाचशे, एकशे आठ दुर्वा अर्पाव्या।।९९।। ऐसे असे संकष्टीव्रत माहात्म्य। गणेशास दुर्वा अति प्रिय। करुन घेता गजानन प्रसन्न। सर्व कार्यसिध्दी प्राप्त होई।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।। अध्याय सहावा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

विमल शुध्द परमात्म स्वरुप। श्रीगणेशा हे तुमचे रुप। सर्वाठायी असशी एकरुप। तुझी लीला मी काय वर्णावी।।१।। इंद्र सांगे राजा शूरसेनासी। झाली पुत्रप्राप्ती कृतवीर्यासी। परी हातपाय नव्हते पुत्रासी। कार्तवीर्य नाव ठेवले त्यासी।।२।। कार्तवीर्यास झाली बारा वर्षे। दत्तात्रेय कृतवीर्य दरबारी आले। राजाने पुजा केली मनोभावे। झाले दत्तात्रेय प्रसन्न।।३।। दत्तात्रेय म्हणाले कृतवीर्यासी। अद्‌भूत पुत्र झाला तुजसी। दाखव तुझा पुत्र मजसी। राजाने पुत्र त्यांचे चरणी ठेवला।।४।। दत्तात्रेयाने कार्तवीर्यास केला मंत्रोपदेश। अनुष्ठान याचे करावे भक्ति पूर्वक। बारा वर्षा नंतर गणेश होईल प्रसन्न। त्याच्या कृपे हातपाय येतील।।५।। कार्तवीर्याने सांगितले पित्यास। तपश्चर्येसाठी पोचवा

अरण्यात। केले त्याने तप तेथे बारा वर्ष। झाला गणेश प्रसन्न त्यासी।।६।। गणेशकृपे प्राप्त झाले दिव्यरुप। सहस्रबाहु, पाय झाले प्राप्त। भीती दाटली देवांच्याही मनात। कार्तवीर्यास सहस्रार्जुन नाव लाभले।।७।। त्याने केली गणेशाची प्रवाळ मूर्ती।'प्रवाळ गणपती' म्हणती मूर्तीसी। शेषाने केले अनुष्ठान या स्थानी। म्हणून त्यास 'धरणीधर' म्हणती।।८।। अनवधानाने व्रत घडले चांडाळणीसी। गजानने विमान पाठविले तिजसाठी। दिव्यदेह प्राप्ती झाली तिजसी। तिची दृष्टीने इंद्रविमान वर उडाले।।९।। शूरसेनाने व्रत केले संकष्टीचे। गणेशे त्याजसाठी विमान धाडीले। प्रजेविना कसा येऊ राजा म्हणे। सर्व प्रजेसही बैसविले विमानी।।१०।। कुष्ठीही बैसला होता विमानी। तेणे विमान उडेना आकाशी। राजा पूर्व कहाणी पूसे दूतांसी। त्यांनी कहाणी सांगितली राजास।।११।। राजा विचारी पापशमन उपाय। देवदूतांनी सांगितले राजास। 'गजानन ' मंत्रोपदेश होईल यास। त्यामुळे पापशमन होईल।।१२।। राजा कुष्ठीसी करी मंत्रोपदेश। बोले मग तो 'गजानन गजानन'। प्राप्त झाला दिव्य देह त्यास। सर्वजण मग स्वर्गलोकी गेले।।१३।। सहस्रार्जुन एकदा गेला मृगयेस। त्याने पाहील जमदग्नी आश्रम। सहस्रार्जुन आला आश्रमात। जमदग्नी ऋषींस झाला आनंद।।१४।। जमदग्नींनी सांगितले राजासी। स्नान करुनी यावे भोजनासी। जमदग्नींनी दिले भोजन सर्वांसी।

सहस्रार्जुन राजा झाला तृप्त।।१५।। राजाने विचारले जमदग्नींसी। मंडपभोजन व्यवस्था झाली कैसी। जमदग्नींनी सांगितले राजासी। हा सर्व प्रभाव कामधेनूचा।।१६।। सहस्रार्जुनास मग इच्छा झाली। म्हणे कामधेनू द्या मजसी। तुम्ही तर आहात ऋषी तापसी। तुम्हास तिची गरज नाही।।१७।। जर तुम्ही स्वखुशी नाही दिली। तर हिरावून नेईन तिजसी। जमदग्नी म्हणाले मग राजासी। उगीचच सत्कारिले तुजसी।।१८।। सहस्रार्जुनाने सैन्यास आज्ञा केली। कामधेनू शरीरातून सेना आली। राजाचे सैन्य पळाले दिशा दाही। राजास मोठे आश्चर्य वाटले।।१९।। राजाने वध केला जमदग्नींचा। राजाने मारीले रेणुकेला। रेणुका म्हणाली सहस्रार्जुनाला। माझा पुत्र तुझा वध करील।।२०।। रेणुकेने स्मरण केले परशुरामाचे। लगेच परशुराम प्रगटला तेथे। मातेची अवस्था पाहून दुःख झाले। ती म्हणे कर सहस्रार्जुनास शिक्षा।।२१।। रेणुका म्हणाली परशुरामासी। एकवीस वेळा निःक्षत्रिय कर पृथ्वी। ऐसे सांगून सोडीले प्राणासी। परमदुःखी झाला परशुराम।।२२।। दत्तात्रेय आज्ञे केली उत्तरक्रिया। नंतर आश्रमात वाघ आला। व्याघ्रभय वाटले परशुरामाला। मातेचे स्मरण केले त्याने।।२३।। स्मरण करता रेणुकेचे शिर आले। कारण सपिंडीकरण नव्हते झाले। त्यामुळे फक्त शिरच आले। अजुन ती तेथे आहे असे मानिती।।२४।। परशुरामाने मातेस विचारिले। क्षत्रियांचे पारिपत्य कैसे करावे।

तेव्हा रेणुकेने तया सांगितले। कर भगवान शिवाची आराधना।।२५।। परशुरामाने शंकरस्तुती केली। भगवान प्रसन्न झाले त्यावेळी। क्षत्रियनाश उपाय पुसला त्यांनी। गणेशाराधना सांगितली शिवाने।।२६।। शिवाने षडक्षर मंत्र उपदेशिला। तपश्चर्येसाठी परशुराम निघाला। कृष्णेच्या उत्तरेस अरण्यात आला। एकाग्रचित्ते जप केला त्याने।।२७।। गजानन प्रसन्न झाला त्यासी। म्हणे मागून घे वरासी। आपला परशु दिला परशुरामासी। 'क्षत्रियांस जिंकशील' वर दिला।।२८।। परशुरामाने कार्तवीर्याचा वध केला। पृथ्वी निःक्षत्रिय केली एकवीस वेळा। नंतर त्याने मोठा यज्ञ केला। पृथ्वी सर्व ब्राह्मणास दान दिली।।२९।। ब्रह्मदेवाने सांगितली तारकासूर कथा। तारकासुराने केली तपश्चर्या। ब्रह्मदेवे त्यासी वर दिधला। तारकासुरास आनंद झाला।।३०।। देव, ऋषी, यक्ष, गंधर्व, राक्षस। यांचे पासून असेल अभय। परि जेव्हा कार्तिकेय जन्म घेईल। तो तुझा वध करील।।३१।। वर प्राप्तीने तारकासूर मातला। सर्वांसी पीडा देऊ लागला। सर्व देवात हाहाकार उडाला। ऋषी ब्रह्मदेवाची तपश्चर्या करती।।३२।। तेव्हा आकाशवाणी झाली। शंकरपुत्रच तारकासूर वध करील। ऐकून सर्व आले कैलासावरी। परी शंकर नसती तेथे।।३३।। गेले सर्वजण पार्वतीकडे। तिने भिल्लीण रुण धारण केले। जेथे शंकर लपले होत। तेथे सर्वांस घेऊन आली।।३४।। परी शंकर बसले ध्यानस्थ। कैसा

करावा समाधी भंग। पार्वतीने सांगितले मदनास। मदनाने कार्य शिरी घेतले।।३५।। मदनाने निर्मिले नंदनवन। पिता वसंतास केले पाचारण। वसंताने केले आल्हादायकवन। मदनाने हळूच बाण सोडीला।।३६।। झाला शंकराचा समाधी भंग। त्याने उघडले आपले त्रिनेत्र। तृतीय नेत्रातून केला अग्नीवर्षाव। मदन त्यात दहन पावला।।३७।। पार्वती आली शंकरापाशी। तुम्हास शरण देव ऋषी। त्यांनीच पाठवले मदनासी। आपण सर्वांचे रक्षण करावे।।३८।। शंकर पार्वतीसह क्रीडा करती। ऐसी हजार वर्षे सरती। परी नाही शंकरास पुत्र प्राप्ती। देव फार चिंतीत झाले।।३९।। देवांनी अग्नीस सांगितले। जावे आपण शंकराकडे। तयासी वराचे स्मरण द्यावे। भिक्षुक रुपे अग्नी गेला।।४०।। शिवा कडे अग्नी आला भिक्षेस। शंकर पार्वती होते क्रीडारत। पार्वतीने ओंजळीत घेतले शिववीर्य। तीच भिक्षा अग्नीस दिली।।४१।। वीर्याने पृथ्वी जाईल जळून। म्हणून अग्नीने टाकले पीऊन। त्यामुळे अग्नी झाला गर्भवान। अग्नी फार लज्जित झाला।।४२।। एकदा गंगेवर गेला स्नानास। सहा स्त्रिया आल्या होत्या स्नानास। अग्निने विचार करुन मनात। शिववीर्य गंगेत टाकून दिले।।४३।। सहा स्त्रिया होत्या स्नान करीत। शिववीर्य प्रवेशिले त्यांच्यात। त्यामुळे त्या झाल्या गरोदर। हे वर्तमान पतींस कळले।।४४।। पती म्हणती करा गर्भत्याग। त्या स्त्रिया आल्या

गंगेवर। आपापला गर्भ दिला टाकून। ते एकत्र होऊन पुत्र जन्मला।।४५।। सहा मुखे असती पुत्रास। असती त्यास बारा हात। असे अतीव सुंदर बालक। नारद तेथे स्नानास आले।।४६।। त्यांनी पाहीले सुंदर बालक। पाहून ते आले कैलासावर। शिवपार्वतीस दिले वर्तमान। पार्वती मग गंगेवर गेली।।४७।। गंगा म्हणे हा पुत्र माझा। अग्नी म्हणे पुत्र माझा। आमचा पुत्र म्हणती सहा स्त्रिया। पार्वतीने पुत्रास शिवाकडे नेले।।४८।। शंकराने पुत्रास मांडी बैसविले। अग्नि, गंगा, सहा स्त्रियांना पाहीले। म्हणती बालकास शिवाने स्वीकारले। म्हणून सर्वही निघून गेले।।४९।। पुढे केले बालकाचे नामकरण। शरजन्मा, कार्तिकेय, पार्वतीनंदन। षण्मातुर, तारकाजित, महासेन। सेनानी, स्कंद, षण्मुख, नामे ठेविली।।५०।। कार्तिकेयास दिले सेनापतीपद। जिंकीले त्याने इंद्र अन बृहस्पतीस। मग त्याने विचारिले शंकरास। त्रिभुवन कीर्तिस्तव व्रत सांगावे।।५१।। शंकराने सांगितले तयास। जेणे प्राप्त होतील चतुर्पुरुषार्थ। होईल शत्रु, संकटांचा नाश। ऐसे वरदचतुर्थी व्रत करावे।।५२।। कार्तिकेयाने केले व्रत यथासांग। मोरावर बैसोन झाला गणेश प्रसन्न। दिले अनेक वर मोर देऊन। मोरावर बसून कार्तिकेय युध्दास गेला।।५३।। कार्तिकेयाने लक्ष वर्ष केले युध्द। शेवटी केला तारकासूर वध। देवदिदेवांस जाहला आनंद। लक्षनगर म्हणती त्या स्थानास।।५४।। मदन स्त्री रती आली शंकराकडे।

म्हणे मला माझी लाज वाटे। माझ्या पतीस परत द्यावे। शंकरास तिची दया आली।।५५।। तिजसी म्हणती मग शंकर। जेव्हा जेव्हा येईल तव मनात। तुझा पती तुझ समोर येईल। ‘मनोभू’ नाम लाभेल त्यास।।५६।। नंतर रती आणि मदन दोघेजण। आले शंकराकडे परत। शंकराने केला एकाक्षर मंत्रोपदेश। मदनाने शतवर्षे जप केला।।५७।। गजानन त्यास झाले प्रसन्न। म्हणाले सुंदर शरीर होईल प्राप्त। मदनाने मूर्ती केली रत्नमय। ‘मदोत्कट’ नामे स्थापिली तेथे।।५८।। येथेच रामाने कापले शूर्पणखेचे नाक। म्हणून यास म्हणती नासिक। कृष्णवतारात मदन झाला रुख्मिणीपुत्र। ऐसा मदनास प्रसन्न झाला।।५९।। प्रलया नंतर करण्या सृष्टी उत्पत्ती। सांगितल गजानने ब्रह्मदेवासी। केली तेणे सप्त मानसपुत्र निर्मिती। पुत्रांनी ब्रह्मदेवास प्रयोजन पूसले।।६०।। ब्रह्मदेवाने आज्ञापिले त्यांसी। करावी तुम्ही सृष्टीची निर्मिती। कश्यप एकाक्षर मंत्रे करी गणेश स्तुती। गजानन झाला त्यास प्रसन्न।।६१।। गजानने त्यास दिले सामर्थ्य। म्हणला करीन तुझे रक्षण। झाला अतिशय मुदित कश्यप। म्हणे गणेशकृपे होईल कार्य।।६२।। काश्यपास दिती, आदिती, दनु, कद्रु। होत्या ऐशा चौदा स्त्रिया। दितीच्या उदरी झाले दैत्य। आदितीच्या उदरी देव गंधर्व।।६३।। दनुने प्रसविले विविध दानव। इतर स्त्रियांपासून किन्नर, यक्ष। राक्षस, सिध्द, चारण, पृथ्वी, गृहक। वृक्ष, नद्या, समुद्र,

लता, धान्य।।६४।। धातु, रत्ने, कृमी, मुंग्या, सर्प। पक्षी इत्यादि सृष्टी अनंत। ऐशी विविधरुपी सृष्टी पाहून। कश्यपास आनंद झाला।।६५।। कश्यपाने मग आपल्या पुत्रांस। दिले अष्टादशाक्षर, षोडशाक्षर मंत्र। द्वादशाक्षर, पंचाक्षर, चतुराक्षर मंत्र। तैसाच एकाक्षर मंत्र उपदेशिला।।६६।। कश्यप पुत्र गेले मंत्र घेऊन। तपश्चर्येचा मनी निश्चय करुन। हजार वर्षे केले तप दारुण। गजानन त्यांस प्रसन्न झाला।।६७।। गणेशाने वर दिला त्यांसी। या स्तोत्रे जो स्तवील मजसी। कार्यसिध्दी, विद्या मिळेल त्यासी। पुत्रार्थ्यास होईल पुत्र।।६८।। कश्यप सुतांनी केली मूर्ती स्थापन। दिली सुमुख, एकदंत, ऐसी नाम। ब्रह्मदेवे केले गणेश सहस्रनाम। त्यातून त्यांनी बारा निवडली।।६९।। बारा नामांचे करिता स्मरण। त्यास न येईल कोणतेच विघ्न। विद्या तयासी होईल प्राप्त। विशेष गणेशकृपा लाभेल।।७०।। सुत सांगती शौनकादिकांसी। उपासना खंड सांगितला तुम्हासी। अलौकिक क्रिडा असे गणेशाची। त्याचे निवेदन आता करतो।।७१।। पूर्वी अंगदेशी रौद्रकेतू नाम द्विज। शारदा त्याची पत्नी सुंदर। झाले त्यांसी दोन तेजस्वी पुत्र। 'देवांतक' आणि 'नरांतक' नामे त्यांची।।७२।। बालके दोन्ही अतिसुंदर। पसरली कीर्ति त्यांची दूरवर। दर्शनासी आले मुनी नारद। पंचाक्षरी मंत्र उपदेशिला पुत्रांसी।।७३।। तपश्चर्येस अरण्यात आले पुत्र। 'पंचाक्षरी' मंत्राचा केला जप। शंकर तयांसी झाले

प्रसन्न। शंकरे अभयवर दिला त्यांसी।।७४।। देवांतक म्हणाला नरांतकास। जिंकून घे तु पाताळ, मृत्युलोक। मग त्याने केले आकाशी उड्डान। जिंकीला त्याने स्वर्गलोक।।७५।। पृथ्वी शरण गेली ब्रह्मदेवासी। तो म्हणे राक्षसे पीडीले सर्वांसी। सर्वजण जाऊ शरण गणेशासी। सर्वांनी गजानन प्रार्थना केली।।७६।। तेव्हा दिव्य आकाशवाणी झाली। आता भिऊ नका कोणी। अवतरेल गजानन कश्यप घरी। दुष्टांचा तो करील संहार।।७७।। आदिती करी गणेशमंत्र जप। गजानन प्रसन्न झाला तिज। ती म्हणे मम उदरी घ्यावा जन्म। श्री गणेशाने 'तथास्तु' म्हटले।।७८।। आदितीस पुत्र झाला तेज संपन्न। बालक म्हणे मी आहे गजानन। उभय आनंदित झाले ऐकून। 'महोत्कट' ऐसे ठेवले नाम।।७९।। महोत्कटा मारण्या आली विरजा राक्षसी। गिळीले तिने महोत्कटासी। भयंकर पोटशूळ झाला तिजसी। पोट चिरुन 'महोत्कट' बाहेर आला।।८०।। आदितीने पाहीले बालकासी। तिने उचलून आणीले त्यासी। 'दृष्ट संहार सुरु झाला' म्हणती ऋषी। परी त्यांनी बालकशांती केली।।८१।। पोपट रुपे आले उध्दत व धुंधुर। महोत्कट खेळण्यास मागे पोपट। घेतले महोत्कटाने झेप घालून। भूमीवर आपटून मारले त्यांना।।८२।। चार वर्षाचा झाला महोत्कट। आदिती त्यास घेऊन गेली स्नानास। महोत्कट तिजसवे शिरला पाण्यात। मगरीने महोत्कटास धरीले।।८३।। महोत्कट मातेचा

धावा करीतसे। त्यानेच मग मगरीस धरीले। बाहेर काढून भूमीवर आपटले। तेथे सुंदर गंधर्व उत्पन्न झाला।।८४।। गंधर्व मग म्हणाला सर्वांसी। मम विवाहास आले होते भृगुऋषी। त्यांचे यथायोग्य स्वागतझाले नाही।म्हणूनी त्यांनी मज शापीले।।८५।। मी शरण गेलो भृगुऋषींसी। त्यांनी उःश्याप दिला मजसी। महोत्कटाचा स्पर्श होता  मजसी। माझी शापातून होईल मुक्ती।।८६।। एकदा तीन गंधर्व आले आश्रमी। पूजा करती शंकर विष्णू पंचायतन मांडूनी। महोत्कटाने पाहीले तेथे येऊनी। त्याने मूर्ती फेकून दिल्या।।८७।।गंधर्वास न सापडती मूर्ती। हे पाहून कश्यप चौकशी करती। आपलेच पुत्राचे काम जाणती। म्हणून पुत्रासी देती दम।।८८।। पुत्र म्हणे मज नसे ठाऊक। परि पित्याने न होई समाधान। पुत्र करी रडण्या सुरुवात। तोंड उघडे ठेवून पडे भूवरी।।८९।। आदिती पाही पुत्रमुखाकडे। विश्व मुखांतर्गत पाहुन कोडे। ती मूर्च्छित होऊन भूवर पडे। कश्यपही पाहती पुत्र मुखात।।९०।। कैलासासह शिव विष्णु सवैकुण्ठ। सत्यलोकासह तेथे दिसे ब्रह्मदेव। सह अमरावती इंद्र, चौदा भुवने। सारे तयांच्या दृष्टीस पडे।।९१।। गंधर्वास सांगती ऋषी कश्यप। पुत्र दंडण्या मज नसे सामर्थ्य। तुम्हीच करावी शिक्षा यास। परी आता भोजनास चलावे।।९२।। द्या पंचायतन देवता ते म्हणती। नंतर ते बालकाकडे पाहती। गणेश, विष्णु, शिव, सूर्य अन् देवी। सर्व रुपांमध्ये बालक

उभा असे।।९३।। गंधर्वास वाटले नवल फार। करती ते बालकास नमस्कार। गाती स्तुती स्तोत्रे नसे पार। जाहले सारे परम संतुष्ट।।९४।। महोत्कटाचे उपनयन पाचवे वर्षी। आले देव, गंधर्व, ऋषी। विघात, पिंगाक्ष, विशाल, पिंगल चपळ। अक्षता रुपात शस्त्रे टाकती।।९५।। महोत्कटाने मंतरुन तांदूळ टाकले। ते पाचही राक्षस मृत्यु पावले। पुष्पवृष्टी केली सर्व देवे। कश्यपांनी उपदेशिला गायत्री मंत्र।।९६।। झाले महोत्कटाचे उपनयन। आनंदले सारे त्रिभुवन। देव ऋषी सारे झाले प्रसन्न। महोत्कटास आशीर्वाद देती।।९७।। महोत्कट रुपे गणेश क्रीडा करी। दृष्ट राक्षसपीडा दूर करी। पृथ्वीसही अतिशय मोद होई। लाभे सर्वांसी समाधान।।९८।। वर्णिला प्रथम उपासना खंड। आता वर्णितो गणेश क्रीडाखंड। वाचता भक्तास लाभेल आनंद। होईल प्रसन्न गणेश सर्वांसी।।९९।। सुरस ऐसा गणेश महिमा वर्णिण्या। द्यावी समर्था या भक्ता प्रेरणा। समर्थ तुम्हीच नवशतीत वर्णिण्या। स्वामी समर्था शरण तुम्हासी।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।। अध्याय सातवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

आता वंदुनी श्री गणेशा। स्वामीपायी ठेवितो माथा। करीन वर्णन गणेशक्रीडा। स्वामींच्या कृपा प्रसादे।।१।। ज्याच्या मस्तकी श्रीगुरुहस्त। त्याचे कार्यास लाभे पूर्णत्व। जीवन त्याचे होई कृतार्थ। गुरुराज माझा स्वामीराया।।२।। उपनयना नंतर पुत्रास घेऊनी। वसिष्ठ आले ब्रह्मदेव भुवनी। त्याने कमळ दिले तीर्थ देऊनी। 'बृहस्पती' ऐसे नाम ठेवीले ।।३।। गळयातील माला अर्पितसे कुबेर। नाव त्याने ठेविले 'सुरानंद'। वरुणाने दिला आपला पाश। 'सर्वप्रिय' ऐसे ठेवीले नाम।।४।। त्रिशुळ,डमरु अर्पितसे शंकर। ठेवीले नाम 'भालचंद्र'। परशु देऊन विष्णु म्हणे 'परशुहस्त'। गर्वाने इंद्र न पूजी त्यास।।५।। कश्यपाने सांगितले इंद्रास। होईल आता तव सर्वनाश। इंद्राने आज्ञापिले

वायुस।‘उडवा आकाशी महोत्कटासी।।६।। परिणाम न होई महोत्कटावर। ‘जाळावे’आज्ञा दिनी अग्नीस। अग्नी सुटला चराचर जाळीत। महोत्कटाने अग्नीसच गिळीले।।७।। इंद्रास आला राग फार । सहस्रनेत्रे पाही महोत्कटास। नेत्री दिसती ईश्वररुपे अनंत। इंद्राने त्यास नमस्कार केला।।९।। इंद्राने महोत्कटाचे केले पूजन। आपला अंकुश केला अर्पण। ‘विनायक ’ ऐसे ठेवले नाम। विश्वरुप स्तोत्राने केली स्तुती।।१०।। स्तोत्रे गणेश झाला प्रसन्न। प्रतिदिनी करता त्रिवार पठन। प्राप्त होईल विजय सर्वत्र। ऐसा इंद्रास दिला वर।।११।। एकेदिनी काशीराजा येई कश्यपाकडे। म्हणे माझ्या मुलाचे लग्न ठरले। आपणच त्याचे पौरोहित्य करावे। इतकी असे माझी विनंती।।१२।। कश्यप पाठवितसे महोत्कटास। वाटेत भेटला धूम्राक्ष राक्षस। सूर्योपासना करी तो मिळण्या विजयीशस्त्र। तपश्चर्या त्याची फळास आली।।१३।। तेजस्वी शस्त्र येई आकाशातून। घेतले महोत्कटाने उडी मारुन। घेऊनी हाती ते गरगरा फिरवून। सोडीले धूम्राक्ष राक्षसावर।।१४।। आले तेथे धुम्राक्षाचे पुत्र। रागाने म्हणती काशीराजास। माझ्या पित्याने वाचविले तुम्हास। हीच का असे उपकारफेड।।१५।। राजा मग म्हणाला त्यांस। असे माझ्याकडे लग्न कार्य। निघालो कश्यप पुत्रास घेऊन। त्यानेच तुझ्या पित्यास मारले।।१६।। राक्षस धावती महोत्कटावर। त्याने श्वास सोडला गर्जना करुन। राक्षस गेले वाऱ्यावर

उडून। नरांतकाच्या नगरात ते पडले।।१७।। नगरजन झाले भयभीत। नरांतकास समजला वृत्तांत। महोत्कट उठवी वायू घेऊन श्वास। सैनिक उडून झाले गतप्राण।।१८।। रागे नरांतके केली निर्भत्सना। राजधानीत महोत्कटासह आला राजा। दंतुर, विंधर राक्षस आले बाळरुपात। बोलावती महोत्कटास खेळण्यास।।१९।। गेला महोत्कट त्यांसह खेळण्या। देऊन आलींगन मारले त्यांना। मारले विद्युत पतंग राक्षसा। पराक्रम पाहुन सर्व जयकार करती।।२०।। ब्रह्मदेव सांगती भृशुंडी कथा। सांगितले गणेशे काशीराजाला। विवाहास बोलवा भृशुंडी ऋषींना। राजा गेला भृशुंडी ऋषीं कडे।।२१।। भृशुंडी म्हणे काशी राजास। माझा गणेश निर्गुण निराकार। भृशुंडी येण्यास देई नकार। आला काशीराजा परत।।२२।। गणेश पुन्हा पाठवी राजाला। मी गजानन असे सांगा त्याला। राजाने तैसे सांगितले ऋषींना। आनंदाने ते आले राजासह।।२३।। राजा करी राजधानीत स्वागत। पूजा केली सिंहासनी बैसवून। भृशुंडी म्हणे न दिसे गजानन। असत्य सांगितले तू मजला।।२४।। राजाने भृशुंडीस दाखवले। मुलांमध्ये पहा गजानन खेळे। गजानन आला भृशुंडीं कडे। विचारी तुमाचा गजानन कैसा असे।।२५।। भृशुंडी करीतसे गजानन वर्णन। गजानन रुप बालक करी धारण। भृशुंडीस अत्यानंद झाला पाहून। नमन करुन त्यास आलिंगन दिले।।२६।। महोत्कटाने मारीले अनेक राज्य राक्षस। केला अंधक

अंभासुराचा वध। मायावी राक्षसीस मारी महोत्कट। काशीराजा स्तुती करी त्याची।।२७।। नागरिक पाहती त्याचा पराक्रम। आले ते राजाकडे एक दिन। म्हणती पाठवा आम्हाकडे भोजनास। राजाने महोत्कटास दिली आज्ञा।।२८।। विविध पाकसिध्दी करती जन। त्या नगरी होता एक ब्राह्मण। अति दरिद्री त्याचे शुक्ल नाम। पतिव्रता विद्रुमा त्याची पत्नी।।२९।। ब्राह्मण भिक्षेस गेला नगरात। प्रजाजन होते पाकसिध्दीत दंग। नित्यवत भिक्षा न मिळे त्यास। घरी येऊन सांगे तो पत्नीस।।३०।। आज बालरुपी विनायक येणार। घरोघरी जाऊन भोजन घेणार। तू ही त्याचे साठी कर भोजन तयार। कदाचित येईल आपुल्या घरी।।३१।। पत्नीने आठरा प्रकारची धान्ये दळली। त्याची तयार केली भाकरी। तांदुळ कण्यांची पेज केली। शुक्ल द्विज करी पूजा तयारी।।३२।। त्या दिनी आला राजा राजसभेत। स्वर्गातून आले सनक सनंदन। तयांसी मग देऊन दर्शन। महोत्कट गंगेवर स्नानास गेला।।३३।। तेथून आला शुक्ल द्विजाचे घरी। झाले आनंदित ते पतिपत्नी। अति आनंदे तो भोजन करी। सर्व प्रजाजन पाहती वाट।।३४।। मग महोत्कट म्हणे द्विजास। मी झालो परम संतुष्ट। मग कडे माग इच्छित वर। आनंदाने मी करीन पूर्ण।।३५।। शुक्ल द्विज म्हणे महोत्कटास। मीठ भाकरीने झालात तृप्त। यातच झाले सर्व काही प्राप्त। धन्य झाले जीवन आमुचे।।३६।। देऊ इच्छिता जर मज

वर। अखंड भक्ती असो तुम्हावर। करा मुक्त या संसारातून। महोत्कटाने त्यांस ऐश्वर्य संपन्न केले।।३७।। महोत्कट येऊन निजला राजवाडयात। सर्व प्रजेस समजले हे वृत्त। भक्तमंडळी आली राजवाडयात। सर्व महोत्कटास आग्रह करती।।३८।। पाहून प्रजाजनांचे गाढ प्रेम। गजानन तयांसी झाला प्रसन्न। ब्राह्मण गृही जाती सनक सनंदन। पाहती गजानन करी भोजन।।३९।। गेले ते दुसऱ्या ब्राह्मणा घरी। गजानन तेथे ही भोजन करी। सर्वत्र दिसे सिंहारुढ गणेशमूर्ती। ते पाहून गर्व गेला त्यांचा।।४०।। सनक सनानंदे केली गजानन स्तुती। केली त्यांनी गजाननाची मूर्ती। देवालय निर्मून स्थापिली मूर्ती। 'गणेश कुंड' नावाचे कुंड निर्मिले।।४१।। भीमव्याध कथा सांगितली ब्रह्मदेवे। भीमव्याध व राक्षस शमीवर चढले। वृक्ष पडला उभयतांच्या भारे। त्याचे एक पान पडले गजाननावर।।४२।। तेणे उभयतांसी घडले पुण्य थोर। झाला दोघांच्या पापाचा नाश। सुंदर रुपे तयांस झाली प्राप्त। गणेशदूत गणेशलोकी घेऊन गेले।।४३।। पूर्वजन्मी सांबराजा होता व्याध। राक्षस पूर्वजन्मीचा प्रधान। दोघेही होते अतिशय क्रूर। अत्यंत पापी दुष्ट होते ते।।४४।। एकदा उभय गेले शिकारीस। वनात होते 'वरद गणपती' मंदिर। दशरथ नृपे स्थापिले हे मंदिर। गणेश कृपे दशरथास पुत्र झाला।।४५।। सांब व प्रधानाने पाहीले मंदिर। उभयतांनी केली पूजा सुंदर। प्रदक्षिणा करुन

घातला नमस्कार। इतकेच पुण्य होते त्यांचे।।४६।। सांब व प्रधान आले राजधानीत। अनेक वर्षानंतर ते पावले मरण। कुंभीपाक नरक झाला प्राप्त। नंतर दोघे झाले व्याध व राक्षस।।४७।। सांबाने केली होती पूजा। गणेश पूजेचे फळ मिळाले दोघा। या जन्मात दोघांना मोक्ष मिळाला। जन्मांतरीची पुण्याई फळली।।४८।। नंतर ब्रह्मदेव वामन वृत्तांत सांगती। ब्रह्मदेवाने निर्मिले मानस पुत्रांसी। कश्यपास ब्रह्मदेव आज्ञा केली। कश्यपाने सृष्टी निर्माण केली।।४९।। चार स्त्रियांपासून निर्मिली सृष्टी। स्त्रीयांत श्रेष्ठ दिती, आदिती। एके दिनी सायंसंध्या समयी। झाली दिती कामातूर।।५०।। कश्यपाचे नाही ऐकले म्हणून। दीतीस दोन पुत्र झाले असूर। नावे हिरण्यकश्यपु अन् हिरण्याक्ष। त्यांनी पंचाक्षर मंत्रे स्तविला शिव।।५१।। प्राप्त झाला तयांसी वर। विष्णुभक्त प्रल्हाद हिरण्यकश्यपु पुत्र। हिरण्यकश्यपुने केला पुत्राचा छळ। विष्णुने नृसिंहरुपे वधिला असूर।।५२।। प्रल्हादाचा पुत्र विरोचन। सूर्यास त्याने केले प्रसन्न। सुर्याने दिधला त्यास मुकुट। डोक्यावर असेपर्यंत रक्षिल त्यास।।५३।। घेतले त्याने जिंकुन त्रिभुवन। देव गेले विष्णुस शरण। विष्णुने केले मोहिनीरुप धारण। स्नान निमित्ते केला त्याचा वध।।५४।। विरोचनाचा पुत्र बली नाम। हवे होते त्यास स्वर्गाचे राज्य। केला त्याने शंभर यज्ञ संकल्प। नव्याण्णव यज्ञ झाले पूर्ण।।५५।। झाले इंद्राचे पद डळमळीत। झाला इंद्र फार चिंताग्रस्त।

केले त्याने महाविष्णु स्मरण। विष्णुने अभय दिले त्यासी।।५६।। विष्णुने प्रवेशिला आदिती गर्भ। दशमासांतरी झाला तिज पुत्र। विष्णु म्हणे कश्यप आदितीस। आपली इच्छा मी केली पूर्ण।।५७।। त्याचे नाव ठेविले 'वामन'। केला कश्यपांनी पुत्राचा व्रतबंध। घेतले करवुन चार वेदाध्ययन। वामन मग पित्यास विचारी।।५८।। सांगा इंद्र संकट निवारण उपाय। पिता म्हणे घे करुन गणेशास प्रसन्न। वामनाने केला षडक्षर मंत्र जप। गजानन प्रसन्न झाला त्यास।।५९।। बहुरुपे वामन आला यज्ञ मंडपी। सर्वांस कौतुक वाटे अती। यथासांग पूजा करी राजा बळी। वामन मग बळीस म्हणाला।।६०।। मी आहे बालक अनाथ। जागा हवी मज तीन पावल। कृपा करुन करावी इच्छा पूर्ण। बळी म्हणे 'तथास्तु' त्यास।।६१।। वामने एके पाऊले व्यापिली पृथ्वी। व्यापिले ब्रह्मांड दुजे पाऊली। नंतर वामन बळीस विचारी। ठेऊ कुठे मी तिसरे पाऊल।।६२।। बळीने पुढे केले आपुले मस्तक। त्यावर पाऊल ठेवी वामन। धाडीले बळीस त्याने पाताळात। दिधले बळीस पाताळराज्य।।६३।। ऐसी अद्भूत गजानन लीला। वर्णिता सुगंधित होई रसना। गजाननाची ऐसी क्रीडा पाहता। होई हर्ष भक्तांच्या चित्ता।।६४।। ब्रह्मदेव गणेश क्रीडा वर्णिती। ऐकून प्रसन्न होई मती। गजानन स्वत: प्रियव्रतास सांगती। तीच कथा ब्रह्मदेवे वर्णिली।।६५।। एकदा पार्वती शंकरास पूसे। गजाननास शमी का प्रिय

असे। तेव्हा शंकर पार्वतीस सांगतसे। प्रियव्रत राजाची ही कथा।।६६।। प्रियव्रतास दोन पत्नी असती। दुजी प्रमा पहिली कीर्ति। प्रमेवर राजाची अधिक प्रीती। झाली कीर्ति नावडती।।६७।। प्रमेस सवती मत्सर भारी। तिने कीर्तिस लाथ मारली। करावा स्वतःचा अंत चिंती कीर्ति। देव पुरोहीते सांगितली गणेशोपासना।।६८।। कीर्ति नित्य करी गजानन पूजा। एके दिनी नाही मिळाल्या दुर्वा। दृष्टान्त गजाननाने दिधला। शमीपत्रे वाहून करी पूजा।।६९।। कीर्तीने शमीपत्रे पुजिला गजानन। झाला तिज गजानन प्रसन्न। म्हणाला प्राप्त होईल पतिप्रेम। होईल पुत्रलाभ तुजला।।७०।। ठेवी नाव क्षिप्रप्रसादन। चवथे वर्षी होईल पुत्राचे मरण। गृत्समदऋषी कृपे लाभेल जीवन। जीवंत पुत्र तुझा।।७१।। पुढे जाहला ऐसा चमत्कार। प्रमेस जडला महारोग विकार। राजा करी तिचा तिरस्कार। कीर्तिवर प्रेम तो करु लागला।।७२।। कीर्तिस प्राप्त झाला पुत्र। नाम ठेविले क्षिप्र प्रसादन। करीतसे प्रभाराणी मत्सर। प्रभाराणीने विष प्रयोग केला।।७३।। झाली कीर्ति अतिशय दुःखी। घेऊन पुत्र कलेवर हाती। गावाबाहेर चार कोस ती आली। पुत्र कलेवर ठेवून झाली शोकमग्न।।७४।। गृत्समदऋषी त्या मार्गे जाती। पाहीली शोकमग्न कीर्ती। गृत्समदऋषी तिजसी सांगती। शमीपत्र वाहण्याचे पुण्य दे त्यास।।७५।। राणीस जाहला अतिशय मोद। तिने तेथेच केला संकल्प। केले पुण्य पुत्रास अर्पण। पुत्र जीवंत होऊन

उठला।।७६।। ऋषी शमी माहात्म्य सांगती। या विषयाचा नारद इंद्र संवाद सांगती। नारदाने इंद्रास कथा सांगितली। ऐकून कीर्ति झाली संतुष्ट।।७७।। और्व नामे वेदशास्त्रसंपन्न द्विज। सुमेधा त्याची पत्नी पवित्र। शमिका कन्या एकुलती एक। दोघे तिजवर करती प्रीती।।७८।। धौम्य ऋषींचा पुत्र मंदार। शौनक ऋषींकडे करी विद्याभ्यास। त्याचे तेज आणि विद्वत्ता पाहुन। और्वने त्यास कन्या अर्पिली।।७९।। एके दिनी घटना घडली विचित्र। भृशुंडी ऋषी आले आश्रमात। मंदार शमिका हसले पाहून। त्यांनी उभयतांना दिला शाप।।८०।। विनाकारण तुम्ही मज हसलात। होईल तुम्हा वृक्षयोनी प्राप्त। पक्षी सुद्धा न स्पर्शतील तुम्हास। मंदार - मंदारवृक्ष शमिका - शमीवृक्ष झाली।।८१।। मंदार आला नाही परत। शौनक ऋषी झाले चिंताग्रस्त। और्वाच्या घरी आले शोधण्यास। दोघे मिळूनी घेती शोध।।८२।। मंदार व शमिका न सापडले त्यांसी। लाविली त्यांनी ज्ञान दृष्टी। भृशुंडी शापे प्राप्त झाली वृक्षयोनी। शौनक, और्व झाले दुःखी।।८३।। दोघांनी षडक्षर मंत्रे केली तपश्चर्या। गजानन तयांसी प्रसन्न झाला। दशभुजा रुपात दर्शन दिले त्यांना। उभयतांनी त्याची स्तुती केली।।८४।। गजानने सांगितले घ्या वर मागून। ह्या स्तोत्राचे नाम ‘कुजन्म शासन’। याचे करिता नित्य पठन। षड्मासांतरी होईल वैभव प्राप्ती।।८५।। और्व अन् शौनकाने सांगितले। मंदार व शमिका यांचे वृक्ष

झाले। व्हावी पूर्वदेह प्राप्ती विनविले। परी गणेश तयांसी म्हणाला।।८६।। भृर्शुंडी ऋषी माझा परमभक्त। नाही वृथा होणार शाप।। मी मंदार वृक्षतळी करीन वास। हा वृक्ष त्रिभुवनी होईल पूज्य।।८७।। माझी मूर्ती या वृक्षतळी स्थापून। पूजा करील शमीपत्रे अर्पुन। त्याच्या सर्व इच्छा करीन पूर्ण। ऐसी शमी झाली गजाननास प्रिय।।८८।। शिव महाबळ स्थानी असता। दोन पत्न्यांसह ब्रह्मदेव आला। त्याने 'यज्ञ करणे' हा हेतू सांगितला। सावित्री गृहकृत्य करत होती।।८९।। गायत्री सवे त्याने यज्ञ सुरु केला। ते पाहून सावित्रीस कोप आला। शापिला सब्रह्मदेव देवांना। म्हणाली तुम्ही 'जड' व्हाल।।९०।। परी 'ड' वर्ण आणि 'ल' वर्ण। असे दोघांमध्ये ऐक्य। म्हणून 'जड'चा अर्थ जल। सारे देव नद्या झाले।।९१।। देवस्त्रिया ब्रह्मदेवास म्हणती। तुमचे मुळे नदी झाले पती। करावी तुम्हीच संकटमुक्ती। ब्रह्मदेवे त्यांस आश्वस्त केले।।९२।। कर्नाटक प्रांती मंदार वृक्षाच्या तळी। प्रभुरामचंद्रे गणेश स्थापना केली। तेथे ब्रह्मदेव आले सर्वा संगती। शमीपत्रे वाहून केली उपासना।।९३।। गजानन झाले देवस्त्रियांस प्रसन्न। परी शाप न होईल व्यर्थ। परी अंशरुपे नदीतही राहून। अंशरुपे करतील देह धारण।।९४।। सर्व देवांनी पूजिली गणेशमूर्ती। 'हेरंब' नाम दिले मूर्तीसी। शमीपत्रे वाहून जे पूजा करती। त्यांसी इच्छापूर्ती होईल।।९५।। झाला प्रसन्न गजानन। देव पातले पूर्व स्थान।

अंशरुप नद्या होऊन। अद्यापही वाहती ते।।९६।। अनेक अवतार धरोनी लंबोदर करीतसे असुरांचा संहार। पदी स्थापितसे वारंवार। देवगणांसी दयाळू गणेश।।९७।। होवोनी धुंडी विनायक। पदी स्थापिले वृंदारक। त्याचे अवतार असती अनेक। वर्णिता न वर्णवती सहस्रमुखा।।९८।। श्रोते परिसा सावधान। पुढील धुंडी विनायकाख्यान। जेणे तुटे भवबंधन। विघ्नशमन होई सहजची।।९९।। जय जयस्वामी लंबोदर। पार्वतीनंदन विश्वंभरा। माझे हृदयी तूची खरा। बैसोनी बोलविसी निज लिला।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

# ।। अध्याय आठवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

आता वंदुनी श्री गणेशा। स्वामी पायी ठेवितो माथा। करीन वर्णन गणेशक्रीडा। श्रीस्वामींच्या कृपाप्रसादे।।१।। ज्याच्या मस्तकी श्रीगुरुहस्त। त्याचे कार्यास लाभे पूर्णत्व। जीवन त्याचे होई कृतार्थ। गुरुराज माझा स्वामीराया।।२।। शमीपत्रे वाहून जे गणेशा पूजिती। त्यांची होईल इच्छापूर्ती। झाला प्रसन्न गणेश कीर्तिसी। झाली ती अति आनंदी।।३।। कीर्ति म्हणे गृत्समद ऋषींसी। द्यावा सोपा मंत्र मम पुत्रासी। गृत्समुदे गणेश कथा कथिली तिजसी। ऐकतसे ती भक्तिभावे।।४।। पूर्वी विष्णु आज्ञापिती कश्यपासी। निर्मिली त्यांनी चतुर्विध सृष्टी। निर्मिल्या त्यात चौऱ्यांशी लक्ष योनी। देवऋषी निर्मिती तीर्थक्षेत्रे।।५।। मुक्तीस्तव शिव निर्मिती वाराणशी। प्रलय समयी तिज शिवरक्षिती। दहावा खंड

पृथ्वीचा काशी। अतिशय पवित्र स्थान हे।।६।। दुरासद राक्षसे केली तपश्चर्या। जाहले शंकर प्रसन्न त्याजला। राक्षस म्हणे नसावा मृत्यु मजला। सृष्टींतील चारही योनीं पासून।।७।। शंकराने वर दिधला त्याला। म्हणून तो मदोन्मत्त झाला। जिंकले त्याने स्वर्ग मृत्यु पाताळाला। नंतर काशी जिंकण्या तो आला।।८।। सर्व देव गेले शरण ब्रह्माला। म्हणती शंकरे वर दिला दुरासदाला। प्रत्यक्ष शिवानेच जर जन्म घेतला। तरच होईल नाश त्याचा।।९।। देवांनी केली पार्वतीची स्तुती। झाली तेव्हा आकाशवाणी। होईल आता दुरासदाचा मृत्यु। पार्वतीने क्रोधाग्नी प्रज्ज्वलीत केला।।१०।। नेत्रातून तिच्या तेजस्वी ज्वाला। श्वासोच्छवासासह बाहेर पडू लागल्या। ज्वालांमध्ये विनायक मूर्ती दिसे देवांना। देवांनी वक्रतुंड नाव ठेवले।।११।। निघे वक्रतुंड युद्ध करण्या। दैत्य सैन्य पाहून केली गर्जना। दैत्याचा पराभव होऊ लागला। करती दोघे मग मल्लयुद्ध।।१२।। दुसरे दिनीही झाले युद्ध। दुरासदास झाले वराचे स्मरण। गजानन करी विराट रुप धारण। दुरासदाची शेंडी पकडली।।१३।। त्यासी मग म्हणे गजानन। आहे ठाऊक तुज नसे मरण। या नगरा समीप रहा पर्वत होऊन। करी रक्षण काशी नगरीचे।।१४।। दैत्य म्हणे मग गजाननास। तू ऐसाचा मजवर पाय ठेवून। जर सदा सर्वदा उभा राहशील। मी पर्वत होऊन पडून राहीन।।१५।। देव करती गजाननाची स्तुती। चतुर्योनीत जीव

तवाश्रये राहती। नित्य कर्मातही तुजसी शोधिती। ‘दुंढीराज’ नामे होशील प्रसिद्‌ध।।१६।। गृत्समद सांगती दिवोदास कथा। केली त्याने बहुत तपश्चर्या। झाले ब्रह्मदेव प्रसन्न त्याला। काशीचे राज्य अर्पिले त्यास।।१७।। त्यावेळी काशी पडली होती ओस। नव्हती झाली पर्जन्यवृष्टी काशीत। दिवोदास पुण्ये पर्जन्यवृष्टी झाली काशीत। सर्व प्रजाजन परत आले।।१८।। दिवोदास वर्तत असे न्याये। पूर्ववत सुरु झाली यज्ञकर्मे। देवही सर्व प्रसन्न झाले। एकमेकाची ते करती स्तुती।।१९।। कीर्ति विचारी गृत्समदांसी। शंकरे का सोडली काशी। गृत्समद सांगती कीर्तिसी। पूर्वी काशीत झाली अनावृष्टी।।२०।। तेव्हा देव शंकरास सांगती। दशसहस्रवर्षे तप करती मारिची। आपण वर द्यावा त्यांसी। त्यास्तव शंकर मंदारपर्वती आले।।२१।। नंतर शंकर काशीस जाऊ इच्छिती। परी दिवोदास असे पुण्यवान अति। म्हणून दिवोदासाचे उणेपण शोधिती। परी सर्वच असती त्याजवर प्रसन्न।।२२।। शंकराने गजाननास सांगितले। तेणे ज्योतिषाचे रुप धरीले। गणेशे दिवोदासास सांगितले। सातवे दिनी सिध्द पुरुष भेटेल।।२३।। म्हणे तो सांगेल तैसे कर। तेणे होईल तव कल्याण। मग विष्णु बुध्दरुप करी धारण। आले ते दिवोदासा पाशी।।२४।। ते सांगती मग दिवोदासासी। तुझी प्रजा निर्गुणोपासक झाली। आत तू काशीचा त्याग करी। तेव्हा दिवोदास त्यास म्हणाला।।२५।। ज्योतिषे

सांगितले होते मज। सिध्दपुरुष भेटेल तुज। करावे त्याचे आज्ञापालन। तेणे मम कल्याण होईल।।२६।। आपण मज सांगितले आज। सोडावे मी काशीचे राज्य। तेणे प्रमाणे मी सोडीन राज्य। जाईन आता मी तपश्चर्येस।।२७।। बुध्दरुपी विष्णु ते ऐकुन। गेले मनातून हर्षुन। म्हणती मुक्ती मिळेल तुज। गेला दिवोदास काशी सोडून।।२८।। गजाननाने केले मूळरुप धारण। राहू लागला तो काशीत। शिवाने प्रवेश केला वाजत गाजत। आनंदाने शिव काशीत राहीले।।२९।। नंतर गृत्समदाने घेतला निरोप। आली कीर्ति ढुंढीराज मंदिरात। केली पूजा दुर्वा शमीपत्रे वाहून। पुत्र कल्याणास्तव केली प्रार्थना।।३०।। गजाननाने केले वरप्रदान। सहस्रवर्षे आयुष्य दिले पुत्रास। दिला आपला परशु त्यास । पुत्रास 'पर्शुबाहु' नाम पडले ।।३१।। कीर्ति कर्णपूर नगरात आली। ओळखले तिजला नागरिकांनी। पुत्रासह पालखीतून आणली राणी। प्रियवत राजा झाला आनंदीत।।३२।। राजा न्यायाने राज्य करी। ऐसी अनेक वर्षे गेली। राज्य सोपवून क्षिप्रप्रसाद करी। राजा तपश्चर्येस निघून गेला।।३३।। पर्शुबाहुने त्रिभुवनी कीर्ती मिळविली। मंदार काष्ठाची गणेश प्रतिमा केली। ती आपल्या गळयात बांधली। हजारो वर्षे केले राज्य।।३४।। नंतर स्वपुत्रास अर्पिले राज्य। गेला गणेशलोकी क्षिप्रप्रसाद। ऐकून व्यास पूसती ब्रह्मदेवास। सांगा असे कोठे गणेशलोक।।३५।। ब्रह्मदेव सांगती व्यासांसी। होते सांगितले

मी नारदासी। त्याने सांगितले मुद्‌गलऋषींसी। मुद्‌गलाने काशीराजास सांगितले।।३६।। तेच मी सांगतो तुम्हासी। एकदा गजाननने कामदायिनी शक्ती। लोक उत्पन्न केला इक्षुसमुद्री। त्यास गणेशलोक नाम दिले।।३७।। नाही येथे राग, सुख, दुःख। नसे जन्म-मृत्यु द्वंद्व। सिध्दी बुध्दी सेवा करती अखंड। कल्पवृक्ष ही असे या लोकी।।३८।। मुद्‌गलऋषी गेले काशीराजाकडे। त्यांनी काशीराजस सांगितले। जी कथा कथिली मुद्‌गलाने। तीच आता तुम्हा सांगतो।।३९।। या लोकास म्हणती स्वानंदभुवन। तैसेच निजलोक ऐसेही नाम। देवांतक, नरांतक, जेव्हा पीडतील त्रिभुवन। गणेश मानवावतरा घेतील।।४०।। राजास म्हणाले मुद्‌गलऋषी। असा गजानन येता तुज घरी। करशील यथासांग पूजा त्याची। मग गणेशलोक प्राप्ती होईल तुज।।४१।। कश्यपाची स्त्री सती आदिती। गणेशे अवतार घेतला तिज उदरी। आला काशिराज मंदिरी सातवे वर्षी। क्रीडा करुन मग स्वलोकी गेला।।४२।। झाला काशिराजा वेडापिसा। मुद्‌गलऋषी सांगती राजाला। याचा देही तू गणेशलोकी वास करावा। ऐसी इच्छा असे माझी।।४३।। मुनी म्हणती मग राजासी। पंचसहस्रवर्षे येथे राज्य करशील। नंतर सदेह गणेशलोकी जाशील। एक कल्प तेथे तू निवास करशील।।४४।। ऐसा काशीराजा पुण्यवंत। तयाचे पुण्ये महोत्कट सान्निध्य। लाभले काशीराजास परमपवित्र। गणेशक्रीडा आता

वर्णितो।।४५।। काशीराजाच्या दरबारात। महोत्कटे केल्या लीला अनंत। सनक सनंद आले राजाच्या राज्यात। महोत्कटाने त्यांचे गर्वहरण केले।।४६।। महोत्कट गेला शुक्ल ब्राह्मणाकडे। आनंदे तेथे भोजन केले। महोत्कटास्तव पालखी पाठविली राजाने। शुक्ल पती पत्नी निरोप देण्या आली।।४७।। पोचवून त्यांना दूरवर पर्यंत। आले उभय घराकडे परतून। झाले चकित चमत्कार पाहून। कुटीस्थानी होता भव्य वाडा।।४८।। तेथे होत्या अनेक दासदासी। विपुल संपत्तीही दिली तयांसी। महोत्कट कृपे झाली दारिद्र्य मुक्ती। झाले सुखी शुक्ल पती पत्नी।।४९।। आता वर्णन करु महोत्कट क्रीडा। रक्षिला तयाने काशीराज। महोत्कट नरांतक युध्द कथा। वर्णिता शब्द पडती अपुरे।।५०।। नरांतक पाठवी शूर व चपळ। राक्षस मारण्या काशीराजास। धावुनी आले ते काशीराजावर। गजानन गेला रक्षणासी।।५१।। गणेशे धरीले तया पायी। आकाशी गरगर तया फिरवी। परी उपजली दया त्याचे मनी। त्याने राक्षसांस जीवंत सोडले।।५२।। शूर व चपळ आले नरांतकापाशी। महोत्कटाचा पराक्रम तया सांगती। ऐकून नरांतक संतापला अती। काशीराजाशी युध्द करण्या आला।।५३।। राजाने सिध्द केले सैन्य। स्तविला तयाने देव गजानन। आली सैन्ये समोरा समोर। प्रधान काशीराजास म्हणाला।।५४।। आले शत्रु सैन्य चाल करुनी। घरे दारे जाळण्या सुरु केले त्यांनी। नरांतक सैन्यावर

चाल करुनी। राजा वाणांचा वर्षाव करी।।५५।। नरांतकाचे सैन्य रेटले मागे। माघार मग ते घेऊ लागले। राजा पाही विजय होत आहे। एकटाच तो सैन्यात शिरला।।५६।। शत्रुसैन्याने मग त्यास वेढिले। धरुन त्यास नरांतकासमोर आणले। झाले उद्दिष्ट साध्य मनीचे। नरांतकास अति आनंद झाला।।५७।। काशीराज पत्नीस मिळे वर्तमान। करी ती दुःखाने आकांत। म्हणे महोत्कटावर ठेवूनी विश्वास। राजाने हे युद्ध केले।।५८।। ऐकूनी तिचा दुःखद आकांत। महोत्कट करी सैन्य सिध्द। सैन्यास प्रमुख असे काळपुरुष। म्हणे तो मज भूक लागली।।५९।। महोत्कटाने तयास सांगितले। नरांतक सैन्य खा मनाप्रमाणे। नरांतकाचे मस्तक घेऊन ये। मजसमीप तू सत्वरी।।६०।। काळपुरुष गेला चाल करुनी। टाकीले शत्रुसैन्य त्याने खाऊनी। नरांतकास धरीले हातानी। महोत्कटासमीप तया आणीले।।६१।। काळपुरुष म्हणे मी केले कार्य। खूप निद्रा आली मज। गणेश म्हणे मममुखी करा प्रवेश। माझ्या उदरी करी निद्रा।।६२।। व्यास मग करती प्रश्न। गजाननाने निर्मिला कोण पुरुष। तयास कैसे केले उत्पन्न। प्रश्न मम मनास वाटे।।६३।। म्हणे ब्रह्मदेव अरे ब्रह्म निर्गुण। दुष्ट संहारासाठी झाले सगुण। तोच असे हा विनायक। विनायकाने स्वेच्छे पुरुष निर्मिला।।६४।। त्या पुरुषाने राक्षस गिळीले। अमात्य पुत्रासह राजासही गिळीले। मग बालक निर्मिला तयाने। तयाने

राजास दिविली वाट।।६५।। राजा, अमात्य पुत्र आले बाहेर। पाहीले तयाने आपुले नगर। पाहुनी विनायकाचा चमत्कार। भक्तिभावे तयाने पूजन केले।।६६।। झाला नरकांत विस्मय चकित। म्हणे हा तर परमात्मा साक्षात। मग करी तो मोठया गर्जनेस। विनायकास धरण्या तो धावला।।६७।। करी विनायक परशु प्रहार। झाला मग नरांतक मूर्च्छित। परी नंतर होवोनी सावध। गेला तो नगरा बाहेर।।६८।। धारण करी तो रुप प्रचंड। वृक्ष पाषाणांचा करी वर्षाव। विनायकाने घेऊनी दिव्य धनुष्य। नरांतकाचे हस्त त्याने तोडले।।६९।। एक हात पडला देवांतक द्वारात। दुसरा पडे पिता रौद्रकेतू दारात। परी तयास लाभले दुसरे हस्त। तो विनायकावर चालून गेला।।७०।। म्हणे विनायक मग दैत्यास। असे पराक्रम तुझा बहुत। तुजसवे पराक्रमी नसे जगात। आता तू मम प्रताप पाही।।७१।। ऐसे बोलून गणेश सोडी बाण। पडला आकाशी दिव्य प्रकाश। तोडीले नरांतकाचे दोन्ही पाय। गणेशे दुसरा बाण सोडला।।७२।। बाणाचा वार झाला कंठावर। नरांतक मस्तक उडाले आकाशात। पडले जाऊन ते रौद्रकेतूचे दारात। परी नरांतकास दुसरे मस्तक आले।।७३।। ऐसे लक्षवेळा गजानने मस्तक छेदिले। परंतु दुसरे मस्तक येत राहीले। विनायकास मोठे आश्चर्य वाटले। झाला चिंतातूर तो मनी।।७४।। विनायकाने नरांतकास मोहीत केले। नरांतकास वेडया सारखे झाले। समोर कोण हे

नरांतकास न उमजे। विनायकाने विराट रुप घेतले।।७५।। विनायकाने नरांतकास चिरडले। देव गंधर्व अतिशय आनंदी झाले। विनायकावर पुष्प वृष्टी करु लागले। नागरिक त्याची करती स्तुती।।७६।। नरांतकाचा पिता रौद्र केतू पाहे। पुत्राचे मस्तक दारी पडले। पाहून मातपित्यांस दु:ख झाले। बोलावले त्यांनी दुसऱ्या मुलास।।७७।। दुसरा मुलगा देवांतक पाही हे। तयासी फार दु:ख झाले। 'महोत्कटास मी मारीन' तो म्हणे। नंतरच भावाचे उत्तरकार्य करीन।।७८।। देवांतकाने आकाशी उड्डान केले। सारे काशीराज नगरापाशी आले। नगरास देवांतक सैन्याने वेढले। नगर रक्षक राजास सांगती।।७९।। समजली राजास ही वार्ता। भये थरथरु लागला राजा। नंतर तो विनायकास म्हणाला। आता तूची रक्षण करावे।।८०।। महोत्कटे टाकीले बालरुप। केले धारण विशाल रुप। सांगे मग तो सिध्दीस। सप्त सख्या व सैन्य करी निर्माण।।८१।। अनिमा, गरिमा,महिमा, लघिमा। प्राप्ती, प्राकाम्य, अशिता, ईशिता। ऐस्या सिध्दी तियेने निर्मिल्या। तैसे निर्मिले प्रचंड सैन्य।।८२।। विनायक करु लागला युध्द। विनायक देवांतकात झाले युद्ध। भराभर निवाले राक्षस सैन्य। शुक्राचार्य त्यांना करी जिवीत।।८३।। गजाननाने मग हे ओळखले। ईशिता सिध्दीस त्याने सांगितले। तिने क्रोधापासून कृत्येस निर्मिले। तिने शुक्राचार्यास बर्बर देशी टाकले।।८४।। कालांतक अन् प्राकाम्य सिध्दी भिडे। सिध्दीचा पराभव

होऊ लागे। अशिताने पर्वत शिखर उचलले। कालंतकास त्यांनी ठार केले।।८५।। मुसलमल्ल अन् मणिमान राक्षस आले। सर्व सिध्दींनी मिळून त्यास मारले। ऐसे तीन दिन युध्द झाले। आता देवांतक युध्दास आला।।८६।। सिध्दींनी केला वृक्षपाषाण वर्षाव। देवांतकाने केले त्यांस हतवीर्य। बुध्दी मग म्हणे गजाननास। मला युध्दास अनुमती द्यावी।।८७।। तेव्हा अनुमती दिली गणेशे। भयंकर गर्जना केली बुध्दीने। तिज मुखातून प्रचंड शक्ती निघे। गेली चालून ती देवांतकावर।।८८।। राक्षस असंख्य बाण सोडी। सर्व बाण ते गिळीले शक्तींनी। राक्षस पळू लागला शेवटी। त्याला पकडून गणेशासमोर आणले।।८९।। म्हणे शक्ती मग गजाननासी। केले स्वाधीन तुझे शत्रुसी। आत असे मज गरज विश्रांतीची। गणेश म्हणे मज उदरी घेई विश्रांती।।९०।। तितक्यात देवांतक तेथून निसटला। आपल्या पित्याकडे तो आला। सर्व हकीकत सांगितली त्याला। पिता म्हणे 'भिऊ नकोस'।।९१।। रौद्रकेतू करी मनी विचार। होतसे राक्षसांचा संहार। करावा यासाठी काही उपाय। फार चिंतीत तो झाला।।९२।। वाटले तया करावी तपश्चर्या। करुन घ्यावे प्रसन्न देवांना। तयांकडून वर मागून घ्यावा। तेणे राक्षस विनाश टळेल।।९३।। पिता म्हणे मग पुत्राला। करावे प्रसन्न शंकराला। देईल वरदान तो तुजला। इच्छित वर घ्यावा मागून।।९४।। देवांतक मनी हा विचार पटला। म्हणे कैसे प्रसन्न करु

शंकराला। सांगावा मार्ग आपण मजला। करी नमन तो पित्यास।।९५।। रौद्र केतूने शंकर महामंत्र दिला। म्हणे या मंत्रे प्रसन्न कर  शिवाला। मग ते दोघे ही बसले तपाला। विधिपूर्वक हवन ही केले त्यांनी।।९६।। होईल प्रसन्न शंकर तयांना। देईल वरदान पितापुत्राला। येथून पुढील कथाभागाला। पहावे पुढील अध्यायी।।९७।। अतिशय सुंदर असे गणेशक्रीडा। क्षमवी संसार ताप पिडा। वाचता करी मन आनंद क्रीडा। ऐसी थोर ही गणेश लीला।।९८।। गणेशाचा हा थोर महिमा। शब्दाक्षरातीत याची गरिमा। नवशतीत शब्दबध्द करण्या। असती श्री स्वामीच समर्थ।।९९।। ठेवितो माथा मी स्वामी चरणी। रहावी वाहती ऐसीच लेखणी। गणेश नवशती ही पूर्ण करोनी। करावे धन्य सिंधुलक्ष्मण सुता।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री ।।

## ।। अध्याय नववा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

माझे सद्‌गुरु स्वामी समर्थ। लाभला तयांचा कृपाप्रसाद। तयांच्या चरणकमली अभिवादन। गणेशलीला वदविती ते।।१।। अद्‌भुत अशा या गणेशलीला। भक्तरक्षणास्तव गणेशे केल्या। जाती सकल पीडा त्या पठिता। गजानन कृपे होई मंगल।।२।। गणेशे धारण केले बालकरुप। महोत्कट नामे तो प्रसिध्द। केला अनेक असुरांचा नाश। रक्षिला गणेशे काशिराजा।।३।। असूर माजता या भूमीवर। करी गणेश अवतार धारण। मारुन सर्व राक्षसगण। तारी तो आपुल्या भक्तांस।।४।। महोत्कटाने संहारिला नरांतक। युध्दा येतसे देवांतक। देवांतक गजाननाचे युध्द। वर्णितसे ब्रह्मा चतुर।।५।। करी गणेश देवांतकाशी युध्द। अष्टही सिध्दी झाल्या प्रकट। बुध्दी मग विनवी गणेशास। द्यावी अनुमती मम

युध्दास।।६।। गजाननाची अनुमती मिळता तिजसी। निघाली युध्द करण्या बुध्दी। प्रचंड शक्ती तिच्या मुखातून आली। गेली चालून ती देवांतकावर।।७।। शक्तीने देवांतक पकडून आणला। परी देवांतक तिथून निसटला। पळत पिता रौद्रकेतूकडे आला। पिता शांतवी देवांतकासी।।८।। पिता म्हणे मग पुत्राला। घे प्रसन्न करुन शिवाला। पित्याने पुत्रास मंत्र दिधला। बसले पिता-पुत्र तपास।।९।। सहस्र वर्षे केली तपश्चर्या। पिता पुत्र बसले हवनाला। केले विधिपूर्वक हवन त्यांनी। देती आहुती मन:पूर्वक।।१०।। हवनाची मग झाली समाप्ती। रौद्रकेतूने दिला पुत्राचा बळी। शंकर प्रसन्न झाले त्यासी। केले पुत्रास परत जीवंत।।११।। ईश्वर होता तया प्रसन्न। उठला पुत्र न लागता क्षण। मग केले अनुष्ठान पूर्ण। नंतर ब्राह्मणांस तो पूजितसे।।१२।। दाने देवोनी अपार। भोजने बैसवी विप्रवर। निशा लोटता समग्र।कुंडातून एक अश्व निघाला।।१३।। त्याते पाहाता दैत्यपती। परम संतोष मानी चित्ती। अलंकार लेववोनी त्याप्रती। पूजा प्रीतीने करीतसे।।१४।। करोनी नमन पितरांसी। वंदिले तयाने ब्राह्मणांसी। घोडयावर मग स्वार होऊनी। निघाला युध्दास तेधवा।।१५।। घोडा खिंकाळे भयानक। भये अनेक देवांचा झाला अंत। टाचेखाली देवसैन्य तो चिरडीत। उडाली देवसैन्यात दाणादाण।।१६।। हिंसे तुरंगम जेव्हा। भूगोल कापे थरथरा तेंव्हा। बहुत वीरश्री चढली दानवा।

त्यांनी धावा घेतल्या रणी।।१७।। आला रणास दानवपती। सिध्दिज वीर पुढे धावती। ठाण मांडोनी घोडयावरती। दैतपती युध्द करितसे।।१८।। लक्षानुलक्ष सोडी शर । करी देवसेनेचा संव्हार। माजला देवसेनेत हाहा:कार। जाहल्या जर्जर सिध्दी रणी।।१९।। सिध्दी पळोन लवलाही। विनायकापासी गेल्या पाही। पाहून ऐसे त्या समयी। विनायकास क्रोध आला।।२०।। सिंहारुढ होवोनी सत्वर। रणी पातला लंबोदर। मुखे सिंहनाद करी थोर। धरणी, चराचर भयें कापें।।२१।। पाहोनी नरांतक विनायकासी। म्हणे व्यर्थ का श्रम करिसी। लहान बालक तू असशी। जा खेळ तू मुलांसवे।।२२।। अरे मी देवांतक वीर। तूते भक्षीन मी सत्वर। पळून जवळ करी निजमंदिर। प्राण आपुले वाचवी।।२३।। ऐकोनी त्याची वाणी ऐसी। हासून त्यास बोले गणपती। रणात दाखवी वीरवृत्ती। वृथा वल्गना करु नको।।२४।। विनायकाने चाप सज्ज केले। शर लावोनी आकर्ण वेढिले। चार बाण त्याने सोडीले। दैत्यास बहु नवल वाटे।।२५।। दोन कुंडले किरीट सतेज। झाला तोडिता गणराज। देवांतकास वाटली लाज। पाहुन तेज:पुंज रिपु।।२६।। आला देवांतक गणेशासमोरी। गणेश म्हणे तू उन्मत्त भारी। झाली नष्ट तुझी बुध्दी। आला जवळी तव मृत्यु समय।।२७।। दैत्ये सोडीले निर्वाणबाण। त्याते छेदून टाकी गजकर्ण। सोडोनिया मग शर दारुण। नादे गगन गाजवितसे।।२८।। महोत्कट

देवांतकावर सोडी बाण। तोडून टाके तो सोडून प्रतिबाण। नंतर गजाननावर सोडी बाण। हुंकारे गजानने केला नाश।।२९।। विनायकाने सोडीले दोन बाण। एकाबाणे खाली पडला मुकुट। दुसऱ्या बाणे कुंडले पडली भूवर। ऐसा हल्ला करी गजानन।।३०।। आणखी दोन बाण गणेशे सोडीले। त्याने देवांतकाचे खांदे भेदिले। आणखी बाण सोडला गणेशे। तो देवांतकाच्या मस्तकी रोविला।।३१।। देवांतकाने घेतले दोन बाण। मोहनास्त्राची स्थापना केली त्यावर। एक जाऊन पडे सिध्दी सैन्यात। दुसरा विनायकासमीप पडला।।३२।। सर्वांनाच आली मोहनिद्रा। दैत्यांस मोठा आनंद वाटला। पुढील यज्ञासाठी विचार केला। अग्नि पेटवून होमहवन केले।।३३।। बसुन नग्न अंग्निकुंडासमोर। मांस खंडाच्या आहुती सहस्त्र। नंतर त्याने पुर्णाहुती दिल्यावर। यज्ञकुंडातून कृत्या आली।।३४।। षोडशोपचारे केली पूजा। वस्त्रे लेवून तो मांडीवर बसला। त्याला घेऊन वर उडाली कृत्या। आकाशातून भ्रमण करु लागली।।३५।। इकडे पाहतसे काशीराजा। सैन्यास गणेशासह मोह पडला। काशिराजा मनी चिंतीत झाला। गणेशाची तो करी प्रार्थना ।।३६।। व्हावे जागे म्हणे काशिपती। बोले पुढे तो विनायका प्रती। काय म्हणू तुम्हास भक्तपती। शयनी प्रीती कैसी धरली।।३७।। तंव स्मरणमात्रे संसार माया। देवाधिदेवा जाती विलया । तो तू दानवास्त्रें मोहोनिया। निद्रिस्त कैसा झालासी।।३८।।

ऐसे ऐकून मग आदिती सुत। होवोनी जागृत उठून बसत। चाप सज्ज करूनी त्वरीत। योजी मनांत अस्त्र तेव्हा।।३९।। पतंगास्त्र आणि घंटास्त्र। सोडिता झाला कश्यप पुत्र। घंटा वाजती चित्र विचित्र। तेणें जागृत जाहली सेना।।४०।। देवसेना होता जागृत। युध्दास सरसाविले दनुजसुत। पतंगास्त्र जपतां पक्षी बहुत। झेपावले तेंव्हा तयांवरी।।४१।। अनेक लक्ष अनेक जातींचे। पक्षी मारती सैन्य परांचे। पक्षवातें सेनावृंद वीरांचे। आकाशपंथी ते उडविती।।४२।। पक्षियांचे पक्षिवात पवनें। धुराळा उडोनिया नयनें। झाकोंनी विव्हल अंत:करणे। दैत्य पडती रणांगणी।।४३।। चंचुपुटे मग पक्षीगण। करिती दैत्यसेनेचे खंडन। अश्व, खर ,उष्ट्र, वारण। सोडीले प्राण तयांनी।।४४।। दानवसेनेत हाहा:कार। पाखरांनी संहारिले असूर। देव करती जयजयकार। देवांतक मनातून गजबजला।।४५।। झाला देवांतक चिंतातूर। करोनी अस्त्रांचा विचार। मग खड्‌गास्त्राचा करुन विचार। सोडी सत्वर अभिमंत्रोनी।।४६।। जेव्हा दानव अस्त्र सोडीत। तेव्हा नादें पृथ्वी कांपत। जाहली खड्‌गे असंख्यात। प्रलय करीत चालली।।४७।। अस्त्रापासोनी वह्नी उसळे। तेणें जळती सिध्दीज दळें। त्या खड्‌गांनी पक्षी सगळे। झाले तेव्हा छिन्नभिन्न।।४८।। सिध्दी पासोनी झाली वाहिनी। ती संव्हारिली खड्‌गांनी। नदी चालली रक्तवाहिनी। उदधीसी भेटावया।।४९।। ऐसें पाहता गणपती। परम संतापला चित्ती।

सोडी वज्रास्त्र त्वरीत गती। तेणें धरणी कांपतसे।।५०।। वज्रास्त्रे खंडोन खड्गे सकल। स्वनादे सेना करुन विकल। त्याहीं संव्हारिले दैत्यबळ। कापे थरथरा जग तेव्हां।।५१।। ऐसे पाहून मग देवांतक। रौद्रास्त्र तो सोडी देख। त्या नादें सकळीक। झाले भयभीत तेधवा।।५२।। देवसेनेत हाहा:कार। जाहला करिता तो महावीर। प्राण सोडी सैन्य सत्वर। लंबोदरास स्मरोनिया।।५३।। रौद्रास्त्रापासून क्रुरकर्मा। उत्पन्न झाला पुरुष सप्तमा। तो देखोन देवोत्तमा। ग्रासावयास धावला।।५४।। ऐसे पाहता आदितीनंदन। सोडी ब्रह्मास्त्र अभिमंत्रून। क्रुरकर्मा पुरुष त्या पासून। जाहला उत्पन्न भयानक।।५५।। तो पुरुष गर्जे प्रबळ। तेणें कापें ब्रह्मांडगोल। दोघे भिडती आकाशी सबळ। दाविती बळ परस्परा।।५६।। दोघे करती मल्लयुध्द। जाहले गुप्त ते प्रबुध्द। विनायक करी सिंहनाद। दानववृंद कापे रणी।।५७।। आपले अस्त्रे विनायके। नाशिले दैत्यसैन्य पराक्रमे। पाहोन ऐसे देवांतके। अस्त्र निके योजिले।।५८।। अभिमंत्रोनी अस्त्र सोडता। शक्ती उत्पन्न झाली तत्त्वता। विनायका वरी शक्ती येता। अष्टसिध्दी धाविन्नल्या।।५९।। त्यांनी धरोनी शक्तीप्रती। आणिता पळाली शीघ्रसती। तिचे केश धरोनी दैत्यपती। फिरवू पाहे न फिरे ती।।६०।। अणिमा धावोन मुष्टिघातें। ताडिती झाली दैत्येशातें। गरिमा, लघिमा अन् वशिमा दैत्यातें। पादप्रहारे ताडिती रणी।।६१।। विभूती आणि प्रकाम्या धावल्या। दानवेंद्रावरी

कोसळल्या। लत्ताप्रहार मारित्या झाल्या। पडला मूर्च्छित दैत्यपती।।६२।। मूर्च्छा सावरोनी देवांतक। धावें मारित प्रलय हांक। तेणें येऊनी विनायक। मुष्टिघाते ताडियला।।६३।। घेऊनिया आयुधें चार। ताडिला त्यांनी मग असूर। दैत्यदेह वज्रसार। न होय चूर किंचितही।।६४।। घनघोर युध्द मांडले। तंव दिनमान सरोन गेले। रात्र दाटली तमोमेळे। कृत्रिम दीप लावले तेव्हां।।६५।। चंद्र ज्योती पाजळल्या अद्भूत। प्रकाशें झुंजती वीर समस्त। तंव रौद्रकेतूने येऊन त्वरीत। माया रचिली विचित्र पै।।६६।। मायामय आदिती निर्मिली। रौद्रकेतूने रणी आणली। वस्त्राभरणें परम शोभली। लागली रडू ती रणांगणी।।६७।। आदिती म्हणे विनायका। पराक्रमी म्हणविसी निका। तुझ्यासमोर दैत्य बालका। करती ऐसी दशा माझी।।६८।। झाला विनायक अतिशय दुःखी। झाली तेव्हा आकाशवाणी। आहे ही मायावी आदिती। तुझी माता आहे सुरक्षित।।६९।। विनायक आला देहभानावर। झाले तया शंकरवराचे स्मरण। दिवसरात्र नसता याचे मरण। याला उषःकालीच मारीले पाहीजे।।७०।। शिवदत्तवर देवांतकासी। प्रातःकाळाविना शस्त्रे तुजसी। न लागतील बा तेजोराशी। हे गजाननास समजले।।७१।। तव प्रातःकाल झाला प्राप्त। देवांतक पाहे आदितीसुत। तंव तो गजवदन दिसत। भयभीत झाला तो मनी।।७२।। गजास्य पाहता विनायक। भ्रांत जाहला देवांतक। म्हणे तयासी विश्वव्यापक। करी

स्मरण शिववराचे।।७३।। सावध होवोनी दैत्यपती। दोही दंत धरोनी हाती। हालवितसे गणेशाप्रती। न मानोनी चित्ती भयाते।।७४।। तव गजवदने काय केले। देवांतकाचे मस्तकी दंत रोविले। तेणें मस्तक भिन्न झाले। शरीर चुरले दैत्याचे ।।७५।। देवांतकाच्या शरीरातून। ज्योती निघाली दैदीप्यमान। ती विनायक देही शिरुन। जाहली लीन क्षणमात्रे।।७६।। तीत योजने देहाकृती। दैत्य प्रेत पडले क्षिती। जयजयकारें देव गर्जती। पुष्पे वर्षती घनदाट।।७७।। दुंदुभी वाजविती सूर। नाचती अप्सरा सुंदर। देवांनी स्तविला लंबोदर। 'उपेंद्र' ऐसे नाव ठेवले।।७८।। दिशा साऱ्या झाल्या प्रसन्न। सुखस्पर्शी वाहे पवन। औषधी जाहल्या रसापन्न। फलसंपन्न वृक्ष जाहले।।७९।। स्वाहा स्वधा वषट्कार। उच्चारुं लागले ऋषीश्वर। 'धरणीधर' नाम सत्वर। ठेविते झाले विनायका।।८०।। ऐकता देवांतकाचे निधन। आले सारे भूपती धाऊन। त्यांनी स्तविला गजानन। 'हृषिकेश' ऐसे नाम ठेवले।।८१।। काशिपती आला धावून लवलाही। ठेवी शीर गणेशाचरणी। सिंहारुढ ते समयीं। धर्मदत्त जांवई झाला।।८२।। गजानने विराटरुप त्यागिले। होऊन बाल महोत्कट रुप धरीले। राजाने प्रेमे आलिंगल दिधले। काशिराजास आनंद झाला।।८३।। काशिराजा म्हणे प्रधानास। पुत्र विवाहास्तव आणले महोत्कटास। परी उद्भवली संकटे अनंत। केले या बालमूर्तीने निवारण।।८४।। संकटांची भीती नसे आता।

पुत्रविवाह उरकून घ्यावा। लागावे विवाहाच्या तयारीला। राजा, प्रधान करती तयारी।।८५।। शुभमुहूर्त विवाहास निवडला। राजकुमाराचा विवाह लावला। आले अनेक राजे लग्नाला। दिले सर्वांनी शुभाशीर्वाद।।८६।। लग्न पार पडले निर्विघ्न। दिले विनायकास पक्वान्न भोजन। नंतर वस्त्रालंकारादि देऊन। राजाने त्याचा गौरव केला।।८७।। सुवर्णरथात बैसला विनायक। निघाला आश्रमाकडे जाण्यास। प्रजा सर्व करी बहु शोक। म्हणती त्यास 'नको जाऊ'।।८८।। महोत्कटाने पाहीले प्रजेचे प्रेम। गेला तो प्रेमे भारावून। नंतर प्रजेची समजूत काढून। आश्रमाकडे जाण्यास निघाला।।८९।। गणेश म्हणे तुमचे हृदयी निरंतर। मीच आहे तो विश्वेश्वर। माझी मूर्ती करुनी साचार। भावोपचारे पूजा तिजसी।।९०।। कश्यपास दूत देती निरोप। येतसे तुमचा पुत्र परत। आले बाहेर आदिती कश्यप। पाहती विनायकाची वाट।।९१।। विनायक पाही त्यांना दुरुन। मारी खाली उडी रथातून। मातेचे चरण धरीले धाऊन। सर्वांस अतिशय मोद झाला।।९२।। कश्यपास मग म्हणाला राजा। बरेच दिवस ठेवीले पुत्राला। परंतु आपण रागावू नका। काय घडले ते मी सांगतो।।९३।। सर्व हकीकत सांगितली राजाने। दहीभात ओवाळला आदितीने। सर्वजण आश्रमात आले। राजाने घेतली विश्रांती।।९४।। कश्यपाने राजाचा पाहुणचार केला। स्वीकारी पाहुणचार काशिराजा। काही दिवस

तेथे राहीला राजा। नंतर आपले नगरास आला।।९५।। काही वर्षे गणेश राही आश्रमात। नंतर करी विनंती मातपित्यास। जाऊ द्यावे मज निजधामास। झाले मातापिता दुःखी।।९६।। नंतर आदिती आणि कश्यप। करती विनंती आपुले पुत्रास। करु नकोस आपली ताटातूट। आपण येथेची रहावे।।९७।। ऐकून मातापित्याची विनंती। विनायक मग म्हणे तयांसी। माझे स्मरण जेंव्हा कराल तुम्ही। प्रत्यक्ष तुमचे समोर येईन।।९८।। इतके तयांसी बोलला विनायक। तेथल्या तेथे तो झाला गुप्त। कश्यपाने बांधिले विनायक मंदिर। स्मरण करिता तो देई दर्शन।।९९।। ब्रह्मदेव म्हणती व्यासांस। सांगितल्या तुम्हा लीला गणेश। गेला शंकराकडे श्री गणेश। शंकरपार्वती झाले आनंदी।।१००।।

श्री गजाननार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। ॐ गं गणपतये नमः।।

।जय षण्मुखबन्धो।

जयदेव जयदेव, जय षण्मुखबन्धो।

सकलोध्दारक तारक वारक भवसिन्धो।। जयदेव जयदेव।

शिवजायातनयस्त्वं वन्दे कपटपटुम्।

अघटितघटनादेव गजावक्त्रधृत देवम्।।१।।

क्रीडाकुञ्जेअटतं, मूषक वाहन कृत देवम्।

गणवृन्दं सन्घटय, नायक त्वं जातम्।।२।।

हे स्कन्दाग्रज त्वं अग्रजजेतारम्।

पितरौजगतः प्रणम्य, अग्रस्थानं अपि प्राप्तम्।।३।।

गोकर्णे संस्थाप्य, पौलस्यापहृत लिंङ्गम्।

सकलदेवकुलं तुष्ट्वा  दर्शित चातुर्यम्।।४।।

हे शिवसूनो सकलं अशिवं नाशयतु।

अघोरशापं तापं पापं मे हरतु।।५।।
जयदेव जयदेव, जय षण्मुखबन्धो।
जगदोध्दारक तारक वारक भवसिन्धो।। जयदेव जयदेव।।

शुभं भवतु

डॉ अ. रा. जोशी डोंबिवली

।। श्री ।।

।। श्री गणेशाराधनम्।।

।। ॐ गं गणपतये नमः।।

एकदन्ताये विद्महे, वक्रतुण्डाय धीमहि।
तन्नो दन्ती प्रचोदयात्।

त्वं सुखकर्ता, त्वं दुःखहर्ता, विघ्नविनाशक नमोऽस्तु ते।
'गणपति - बाप्पा' इति प्रसिध्दः सिध्दिविनायक नमोऽस्तु ते।।
मूषकवाहन, मुनिजनवन्दन, गिरिजानन्दन नमोऽस्तु ते।
चंद्रकदण्डित, सिन्दुरमण्डित, पण्डितवन्दित नमोऽस्तु ते।।
विद्यादायक, बुध्दिप्रदायक, हे गणनायक नमोऽस्तु ते।
संततिकारक, भवभयवारक, संकटहारक नमोऽस्तु ते।।
करुणासिंधो षण्मुखबंधो, इन्दुधरात्मज नमोऽस्तु ते।
पाशांकुशधर, पीताम्बरधर हे लंम्बोदर नमोऽस्तु ते।।

व्यासविरचितभारतलेखक, आनन्दकन्द नमोऽस्तु ते।
मोदकवांच्छित, उत्सवकांक्षित एकदन्त ॐ नमोऽस्तु ते।।
मंगलदायक, भक्तोध्दारक, हे शिवात्मज नमोऽस्तु ते।
भुवननन्दित, सकलपूजित हे उमासुत नमोऽस्तु ते।।
त्वमग्र पूजित स्कंदाग्रज हे गजवक्त्र नमोऽस्तु ते।
त्वं धूम्रवर्णः शूर्पकर्णः रक्तवर्ण हे नमोऽस्तु ते।।
पापात्माहं तव शरणागतः पाहि पाहि मां कृपानिधे।
रामात्मजोऽहं तवचरणागतः रक्ष रक्ष मां दयानिधे।।
पाहि पाहि मां कृपानिधे

रामात्मजः

शुभं भवतु

डॉ अ. रा. जोशी डोंबिवली